




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८४ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# ठाण्यात महायुतीचाच महापौर : रवींद्र चव्हाण

## मनसेचा शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, ठाण्यात महायुतीचाच महापौर होणार अशी माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावरुन आल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक होणार आहे. त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजते.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांची या तिन्ही महानगरपालिकांमध्ये महायुतीचा महापौर होण्यासंदर्भात यापूर्वीच झालेल्या भेटीत सविस्त्र चर्चा झालेली आहे. तिन्ही महानगरपालिकेमध्ये महायुतीला जनादेश मिळाला आहे त्यामुळे या जनादेशानुसारच तीनही महानगरपालिकेत महायुतीची सत्ता स्थापन होणार असल्याची माहिती भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली आहे.

दरम्यान, कल्याण डोंबिवली महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे आणि माजी आमदार राजू पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतली होती. त्यानंतर स्थानिक पातळीवर मनसेने शिवसेना शिंदे गटासोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच हा निर्णय पूर्णतः स्थानिक पातळीवरील असून, स्थानिक प्रश्न आणि त्यासंबंधीत परिस्थिती लक्षात घेऊन घेण्यात आला असल्याचे मनसेने त्यांच्या अधिकृत ट्विटर खात्यावर स्पष्ट केले आहे.

खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, आज 53 नगरसेवकांसह आम्ही गट नोंदणी करायला आलो. कल्याण डोंबिवलीत महायुतीसोबत मनसे आल्याने आमची ताकद वाढली आहे. याठिकाणी शिवसेना-भाजपा-मनसे एकत्रित येऊन महायुती सत्ता स्थापन करणार आहोत. विकासासाठी जे आमच्या सोबत येतील त्यांचे स्वागत आहे.

ठाकरे सेनेने पाठिंबा दिला तरीही त्यांचे स्वागत आहे. उल्हासनगरमध्येही वंचित बहुजन आघाडीचे 2 नगरसेवक यांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. तिथे जो मॅजिक फिगर आहे तो शिवसेनेने पार केला आहे. महाराष्ट्रात महायुती म्हणून निवडणूक लढलो तिथे महायुतीचा महापौर बसेल.

## थोडक्यात...

### महापौरपदाबाबत भाजप करणार नाही तडजोड!

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** मुंबईचे महापौरपद आपल्याकडेच पाहिजे, त्यावर तडजोड होऊ शकत नाही अशी भूमिका घ्या, असे निर्देश भाजपच्या दिल्ली नेतृत्वाने राज्यातील नेत्यांना दिल्याचे खात्रीलायक सूत्रांनी सांगितले. प्रदीर्घ प्रतीक्षा आणि संघर्षानंतर आपल्याला मुंबई महापालिकेत मोठे यश मिळाले आहे. 89 जागा जिंकल्यामुळे महापौर पदावर आपलाच हक्क आहे, ही भूमिका मित्रपक्ष शिंदेसेनेसमोर मांडा. हे करताना कोणतीही कटुता येणार नाही याचीही दक्षता घ्या, असे पक्षनेतृत्वाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळविल्याची माहितीही सूत्रांनी दिली. महापौरपद आपल्याकडेच यायला हवे ही मुंबईतील कार्यकर्त्यांची भावना असून त्या भावनेचा सन्मान करायचा आहे. नेमके हेच मित्रपक्षाला सांगा. त्याचवेळी मुंबई पालिकेतील अन्य पदे आणि अन्य महापालिकांमधील पदांबाबत शिंदेसेना व राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्याशी सन्मानजनक तोडगा काढा, असेही नेतृत्वाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मुंबईच्या महापौरपदाबाबत देवेंद्र फडणवीस आणि उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यात चर्चा झाल्याचे वृत्त निराधार असल्याचे खा. संजय राऊत यांनी सोमवारी स्पष्ट केले.


### अवघ्या 21 दिवसांत चांदी लाखाने महागली

**नागपूर (समर्थ गांवकरी) :** नवीन वर्ष-2026 च्या सुरुवातीलाच सराफा बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. अवघ्या 21 दिवसांच्या कालावधीत सोने आणि चांदीच्या किमतींनी सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. विशेषत: चांदीच्या दराने मोठी झेप घेतली असून, अवघ्या तीन आठवड्यांत किलो चांदी 1 लाख रुपयांनी वधारली, तर 24 कॅरेट सोन्याच्या किमतीतही 24 हजार रुपयांची विक्रमी वाढ झाली. बुधवारी सोन्यात एकाच दिवसांत 10 हजार आणि चांदीत तब्बल 16 हजार रुपयांची वाढ झाली.

# शिवसेना ठाकरे गटाच्या सरिता म्हस्के 'नॉट रिचेबल'!

## म्हस्के आमच्याच संपर्कात, कुठेही गेलेल्या नाहीत; अनिल परबांचे स्पष्टीकरण

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




महापालिका निवडणुकांचे निकाल लागले असून आता महापौर पदाच्या निवडीवरून रस्सीखेच सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यातच विजयी नगरसेवकांची पळवापळवी देखील करण्याचे प्रकार सुरू झाल्याचे बोलले जात आहे. मुंबईसह उपनगरातील महापालिकांमध्ये नगरसेवकांना फोडण्याचा प्रयत्न होत असून शिवसेना ठाकरे गटाचे 4-5 नगरसेवक फुटल्याची चर्चा आहे. त्यात मुंबई वॉर्ड क्रमांक 157 मधील ठाकरे गटाच्या नगरसेविका सरिता म्हस्के नोट रिचेबल आहेत. यावर आता आमदार अनिल परब यांनी स्पष्टीकरण दिले आहे. सरिता म्हस्के या नोट रिचेबल असल्याने एकच खळबळ उडाली होती. आता यावर अनिल परब यांनी भूमिका मांडली आहे. ते म्हणाले, नगरसेविका सरिता म्हस्के आमच्या संपर्कात आहेत, त्या कुठेही गेलेल्या नाहीत. त्यांनी त्यांचे कौटुंबिक कारण सांगितले आहे. पुढील एक महिन्यापर्यंत कोकण विभागीय आयुक्तांकडे नोंदणी करण्यासाठी कायदेशीर वेळ आहे. त्यामुळे सरिता म्हस्के यांची नोंदणी होईल. म्हस्के यांनी दिलेले कारण आम्ही कोकण विभागीय आयुक्तांना सांगितले आहे, अशी माहिती परब यांनी दिली. तसेच पुढील एक महिन्यात त्या न आल्यास काय कारवाई करायची याबाबत पक्षश्रेष्ठी ठरवतील, पण अशी वेळ येणार नसल्याचेही परब यांनी स्पष्ट केले आहे. मुंबईच्या महापौरबाबत प्रश्न विचारला असता अनिल परब म्हणाले, देवाच्या मनात काय आहे हे उद्या सकाळी 11 वाजता कळेल, असे उत्तर त्यांनी दिले आहे. त्यामुळे मुंबईच्या महापौर संदर्भात आणखी सस्पेन्स वाढला आहे. तसेच महापौर पदाचे आरक्षण जाहीर होऊ द्या, उमेदवार ठरू द्या, मग पाहू काय करायचे, असेही परब यांनी यावेळी म्हटले आहे.

तसेच कल्याणमध्ये मनसेने घेतलेल्या भूमिकेवर अनिल परब यांनी बोलणे टाळले आहे. मनसेने घेतलेल्या भूमिकेवर आम्ही बोलणार नाही. तो त्यांचा स्वतंत्र पक्ष आहे, असे परब यांनी म्हटले.

दरम्यान, मुंबईत ठाकरे गटाचे 65 नगरसेवक निवडून आले असून महापौरपदासाठी शिंदे गट आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू असतानाच, नगरसेवकांच्या फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आला आहे. ठाकरे गटाने बोलावलेल्या नगरसेवकांच्या महत्त्वाच्या बैठकीला आणि गट नोंदणीसाठी नवी मुंबईला रवाना झालेल्या पथकातून नगरसेविका सरिता म्हस्के या गैरहजर राहिल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. म्हस्के या शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या शक्यतेने खळबळ उडाली असून, त्यांच्या या गूढ अनुपस्थितीमुळे ठाकरे गटात चिंतेचे वातावरण तर शिंदे गटाच्या पुढील हालचालींबाबतचा सस्पेन्स अधिकच वाढला आहे.

# लोभाची महामारी संपूर्ण भारतात पसरलीय : राहुल गांधी

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



राहुल गांधी यांनी बुधवारी सांगितले की, देशभरात लोभाची महामारी पसरली आहे. याचे सर्वात भयानक रूप शहरी दुरवस्थेच्या स्वरूपात समोर येत आहे. लोकांनी सरकारकडून उत्तराची मागणी केली पाहिजे. त्यांनी आरोप केला की, सत्ता आणि मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांमधील संगनमतामुळे लोकशाहीची मूळ भावना कमकुवत होत आहे. लोकशाही तेव्हाच मजबूत होईल जेव्हा प्रश्न विचारले जातील. राहुल यांनी ही टिप्पणी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरील एका पोस्टमध्ये केली. राहुलने मीडिया रिपोर्टचा व्हिडिओही शेअर केला, जो कथितरित्या दिल्लीतील मुबारकपूर डाबस येथील शर्मा एन्क्लेव्हचा आहे. व्हिडिओमध्ये गटार ओव्हरफ्लो झाल्यामुळे परिसरात पसरलेले घाणेरडे पाणी दाखवले आहे. ते म्हणाले, 'आज प्रत्येक सामान्य भारतीयाचे जीवन असेच नरकयातना बनले आहे. व्यवस्था सत्तेत बसलेल्या लोकांच्या हातात विकली गेली आहे. सर्वजण एकमेकांची पाठ थोपटतात आणि मग एकत्र येऊन जनतेला चिरडतात.' ते म्हणाले, 'देशभरात लोभाची महामारी पसरली आहे. शहरी कुजकेपणा हे त्याचे सर्वात भयानक रूप आहे. आपला समाज मरत आहे कारण आपण या कुजकेपणाला 'न्यू नॉर्मल' मानले आहे. सुन्न, शांत आणि उदासीन होऊन. उत्तराची मागणी करा, नाहीतर हा कुजकेपणा प्रत्येक दारापर्यंत पोहोचेल.'

# मद्रास HCने म्हटले- लिव्ह-इनमध्ये महिला तेव्हाच सुरक्षित...

**चेन्नई : (समर्थ गांवकरी)**

- जेव्हा पत्नी मानतात:पुरुष मॉडर्न बनून संबंध ठेवतात, तुटल्यावर चारित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात

मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने म्हटले आहे की, लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलांना सुरक्षा तेव्हाच मिळेल, जेव्हा त्यांना पत्नीचा दर्जा दिला जाईल. न्यायालयाने म्हटले की, अशा नात्यांमध्ये महिलांना वैवाहिक सुरक्षा मिळत नाही, त्यामुळे महिलांना संरक्षण देणे ही न्यायालयाची जबाबदारी आहे. न्यायमूर्ती एस. श्रीमथी यांनी एका आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताना ही टिप्पणी केली. त्या व्यक्तीवर आरोप आहे की, तो महिलेसोबत आधी लिव्ह-इनमध्ये राहिला. नंतर लग्नाचे खोटे आश्वासन देऊन महिलेसोबत शारीरिक संबंध ठेवले. यावर न्यायालयाने म्हटले की, पुरुष आधी मॉडर्न बनून लिव्ह-इनचे नाते निर्माण करतात. नंतर नातेसंबंध बिघडल्यावर महिलेच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. ते असे करू शकतात कारण कायद्यात लिव्ह-इनबाबत कोणतेही नियम नाहीत. पीडितेने सांगितले की, ती आणि आरोपी शाळेपासून एकमेकांना ओळखत होते, नंतर ते रिलेशनशिपमध्ये आले. ऑगस्ट 2024 मध्ये दोघे घरातून पळून गेले आणि लग्न करण्याचा विचार केला. पण महिलेच्या कुटुंबाने बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी त्या जोडप्याला पकडून घरी पोहोचवले. नंतर आरोपी परीक्षेचे कारण देत लग्न टाळत राहिला. या काळात त्यांच्यात शारीरिक संबंधही प्रस्थापित झाले.

# ठाकरे गटाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



- मुंबई महापालिकेत पक्षाचे करणार नेतृत्व
- ठाकरेंनी महापौर पदानंतर दिली दुसरी मोठी संधी
- उद्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची नियुक्ती केली आहे. किशोरी पेडणेकरांनी यापूर्वी मुंबईच्या महापौर म्हणून काम केले आहे. त्यानंतर आता पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

मुंबई महापालिकेची गत 15 तारखेला निवडणूक झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या मतमोजणीत भाजपला सर्वाधिक 89 जागा मिळाल्या, तर ठाकरे बंधूंच्या युतीला अवघ्या 71 जागांवर समाधान मानावे लागले. परिणामी, ठाकरेंची मुंबई महापालिकेवरील तब्बल 25 वर्षांची सत्ता संपुष्टात आली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने आज मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची निवड केली. किशोरी पेडणेकर मुंबई महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक 199 मधून विजयी झाल्या होत्या. त्यांनी शिंदे गटाच्या आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवार रुपल कुसळे यांचा पराभव केला.

ठाकरे गटाच्या गटनेतेपदासाठी किशोरी पेडणेकर यांच्यासह विशाखा राऊत, मिलिंद वैद्य व श्रद्धा जाधव यांची नावे चर्चेत होती. पण आज नवनिर्वाचित नगरसेवकांच्या झालेल्या बैठकीत पेडणेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. किशोरी पेडणेकर या ठाकरे गटाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. शिवसेनेत फूट पडल्यानंतर पक्षाच्या अनेक नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. पण पेडणेकरांनी खंबीरपणे ठाकरेंची साथ दिली. पक्षाच्या पडझडीच्या काळात त्यांनी प्रसारमाध्यमांवर पक्षाची यशस्वीपणे बाजू माडंली. या सर्व गोष्टींचा विचार करून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या खांद्यावर गटनेतेपदाची जबाबदारी टाकल्याची माहिती आहे. महापौर पदाच्या निवणडणुकीसाठी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात सर्वच पक्षांच्या नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक बोलावण्यात येईल. त्यात महापौर निवडणुकीची प्रक्रिया पार पडले. त्यानतंर नवनिर्वाचित महापौर राजकीय पक्षांचे गटनेत्यांच्या नावांची घोषणा करतात अशी पद्धत आहे. त्यासाठी राजकीय पक्ष एका सिलबंद लिफाफ्यामध्ये आपल्या पक्षाच्या गटनेत्याचे नाव लिहून देतात. महापौर ते नाव वाचून दाखवतात. पण यंदा बहुतांश पक्षांनी यापूर्वीच आपल्या गटनेतेपदाची नावे जाहीर केली आहेत.


दुसरीकडे, मुंबई महापालिकेत 6 नगरसेवक निवडून आलेल्या मनसेने आपल्या पक्षाच्या गटनेतेपदी यशवंत किल्लेदार यांची निवड केली आहे. तर काँग्रेसने या पदासाठी कुर्ल्याचे नगरसेवक अश्रफ आझमी यांचे नाव निश्चित केले आहे. काँग्रेसने मंगळवारी कोकण भवनात जाऊन आपल्या पक्षाच्या गटाची नोंदणी केली.

दुसरीकडे, मुंबईसह राज्यातील सर्वच 29 महापालिकांतील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत उद्या 22 जानेवारी रोजी काढली जाणार आहे. त्यासाठी राज्याच्या नगरविकास विभागाने जय्यत तयारी केली आहे. या सोडतीनंतरच मुंबईसह राज्यभरातील महापालिकांत कोणत्या प्रवर्गाचा महापौर होईल हे स्पष्ट होणार आहे.

# देवेंद्रजी पिकनिकला माझ्याशिवाय जाऊच शकत नाहीत

## दावोस दौऱ्यावरून अमृता फडणवीसांचे मिश्किल वक्तव्य, मुंबईच्या महापौराबाबतही सूचक विधान

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष मुंबईच्या महापौरपदाकडे लागले आहे. मुंबईचा महापौर भाजपचा होणार की शिंदे गटाचा? आणि तो मराठी असेल की अमराठी? या चर्चांना उधाण आले असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मोठे विधान केले आहे. "मुंबईचा महापौर हा महायुतीचा आणि मराठी माणूसच होणार," असे सांगत त्यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यावरून टीका करणाऱ्या संजय राऊतांनाही त्यांनी प्रत्युत्तर देत, मिश्किल वक्तव्य केले. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने ८९ जागा जिंकून मोठे यश मिळवले असले तरी, सत्तास्थापनेसाठी त्यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची साथ अनिवार्य आहे. महापौर भाजपचा की शिवसेनेचा, यावरून चर्चा सुरू असतानाच अमृता फडणवीस यांनी 'मराठी महापौर' होणार असल्याचे सांगून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. महायुतीमधील मराठी नगरसेवकांपैकीच एकाला हे पद मिळेल, असे संकेत त्यांच्या विधानातून मिळत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यावर खासदार संजय राऊत यांनी 'पिकनिक' म्हणून टीका केली होती. या टीकेचा समाचार घेताना अमृता फडणवीस यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "मुख्यमंत्री दावोसला पिकनिकसाठी गेलेले नाहीत. ते महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक आणण्यासाठी आणि राज्याला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गेले आहेत. आर्थिक विकासासाठी हा दौरा अत्यंत महत्त्वाचा आहे." संजय राऊतांना उत्तर देताना अमृता फडणवीस यांनी एक मिश्किल टोलाही लगावला. त्या म्हणाल्या, "राऊत म्हणतात तशी ही पिकनिक नाही. आणि मुळात, जर कधी ते खरोखरच पिकनिकला जाणार असतील, तर ते माझ्याशिवाय जाऊच शकत नाहीत!" त्यांच्या या उत्तरामुळे उपस्थित असलेल्यांमध्ये एकच हशा पिकला. या विधानातून त्यांनी राऊतांच्या टीकेतील हवाच काढून घेतली.

# भारताचा न्यूझीलंडवर ४८ धावांनी धमाकेदार विजय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



भारताने दिलेल्या २३९ धावांच्या विशाल लक्षाचा पाठलाग करताना न्यूझीलंडने कडवी झुंज दिली, मात्र विजयाचे शिखर गाठण्यात त्यांना अपयश आले. भारताच्या बलाढ्य फलंदाजीमुळे मिळालेल्या मोठ्या धावसंख्येच्या जोरावर टीम इंडियाने हा सामना सहज खिशात टाकला. न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली होती. सलामीवीर डेव्हन कॉनवे पहिल्याच षटकात अर्शदीपचा शिकार झाला. मात्र, त्यानंतर ग्लेन फिलीप्साने वादळी फलंदाजी करत भारतीय गोटात घबराट निर्माण केली होती. फिलीप्साने क्लीन हिट्स मारत वरुण चक्रवर्ती आणि जसप्रीत बुमराह सारख्या दिग्गज गोलंदाजांवरही हल्ला चढवला. जोपर्यंत फिलीप्सा आणि चॅपमन खेळत होते, तोपर्यंत न्यूझीलंड सामन्यात कायम होते. मात्र, हे दोघे बाद होताच किवींचा डाव पत्त्यासारखा कोसळला. पुन्हा एकदा अर्शदीपने आपल्या गोलंदाजीने प्रभावित केले. सुरुवातीलाच महत्त्वाची विकेट घेत त्याने न्यूझीलंडला बॅकफूटवर ढकलले. तो आजच्या विजयाचा प्रमुख सूत्रधार ठरला. दुसरीकडे भारताचा हुकमी एक्का असलेला बुमराह आज काहीसा लयीत नसल्याचे दिसले. त्याच्या गोलंदाजीमध्ये नेहमीसारखी धार दिसली नाही, जे भारतीय चाहत्यांसाठी चिंतेचे कारण ठरू शकते. सामना जरी भारताने जिंकला असला, तरी क्षेत्ररक्षणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. आजच्या सामन्यात भारतीय खेळाडूंनी काही अतिशय सोपे झेल सोडले. तज्ज्ञांच्या मते, द्विपक्षीय मालिकेत या चुका दुर्लक्षित केल्या जाऊ शकतात, मात्र विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेत अशा चुका भारताला महागात पडू शकतात. भारताच्या फलंदाजीच्या जोरावर हा विजय सुकर झाला असला, तरी गोलंदाजीतील बुमराहची लय आणि क्षेत्ररक्षणातील चुका यावर टीम इंडियाला काम करावे लागणार आहे.

# महायुतीच्या ५२ विजयी नगरसेवकांचा सत्कार

## महापालिका निवडणुकीत विकासात्मक विचारांचा विजय झाला - प्रा. माणिक विधाते



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

येथील महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) व भारतीय जनता पक्षाच्या सर्व ५२ विजयी नगरसेवकांचा शहर सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते यांनी गौरव केला. हा सत्कार सोहळा आमदार संग्राम जगताप व डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

विशेष म्हणजे, हा सत्कार कार्यक्रम केवळ एका ठिकाणी मर्यादित न राहता नगरसेवकांच्या घरोघरी तसेच त्यांच्या प्रभागात जाऊन आयोजित करण्यात आला होता. कार्यकर्ते, नागरिक आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित विजयी नगरसेवक संपत विजय बारस्कर, डॉ. सागर अर्जुन बोरुडे, दिपाली नितीन बारस्कर, महेश रघुनाथ तवले, संध्या बाळासाहेब पवार, गौरी अजिंक्य बोरकर, ज्योती अमोल गाडे, काजल गोरख भोसले, हरप्रीतकौर जगजीतसिंग गंभीर, मोहित प्रदीप पंजाबी, सुनिता किसन भिंगारदिवे, कुमार बबन वाकळे, आशा किशोर डागवाले, सुरेश लक्ष्मण बनसोडे, सुजाता महेंद्र पडोळे, अनिता विपुल शेटीया, अविनाश हरिभाऊ घुले, प्रकाश बाबुराव भागानगरे, सुनिता भगवान फुलसौंदर, मीना संजय चोपडा, गणेश पुंडलिक भोसले, पोर्णिमा विजय गव्हाळे, गीतांजली सुनिल काळे, सुनिता महेंद्र कांबळे, वर्षा सुजित काकडे, मयूर कन्हैयालाल बांगरे, आश्विनी सुमित लोंढे यांच्यासह भाजपचे विजयी नगरसेवक सुजय अनिल मोहिते, शारदा दिगंबर ढवण, रोशनी प्रवीण भोसले-त्र्यंबके, निखिल बाबासाहेब वारे, ऋग्वेद महेंद्र गंधे, धनंजय कृष्णा जाधव, मनोज लक्ष्मण दुल्लम, सोन्याबापू तायगा शिंदे, सुनिता श्रीकृष्ण कुलकर्णी, करण उदय कराळे, वर्षा रोहन सानप, पुष्पाताई अनिल बोरुडे, वंदना विलास ताठे, बाबासाहेब सोन्याबापू वाकळे, आशाबाई लोभाजी कातोरे, महेश राम लोंढे, शीतल अजय ढोणे, मयुरी सुशांत जाधव, सागर राजू मुर्तडकर, सुभाष सोपानराव लोंढे, दत्तात्रय सोमनाथ गाडळकर, विजय मोहन पठारे, ज्ञानेश्वर शिवाजी येवले, कमल जालिंदर कोतकर व मनोज शंकर कोतकर यांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला.

सत्कारप्रसंगी बोलताना प्रा. माणिक विधाते म्हणाले की, "या महापालिका निवडणुकीत केवळ राजकीय बदल नव्हे, तर विकासात्मक विचारांचा विजय झाला आहे.

अहिल्यानगरच्या नागरिकांनी विकासाला स्पष्ट पसंती दिली असून, त्यामुळेच महायुतीला एकहाती सत्ता दिली आहे. विकासात्मक नेतृत्वावर जनतेने विश्वास दाखवला आहे.

आज महापालिकेत अनेक नवोदित, अभ्यासू व अनुभवी चेहरे निवडून आले आहेत. ही केवळ पदांची जबाबदारी नसून, शहराच्या भविष्याची जबाबदारी आहे. आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगरचा विकास अधिक वेगाने होत आहे.

# अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या १७ कर्मचाऱ्यांची दिव्यांग प्रमाणपत्रे बोगस; कारवाईचे संकेत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषदेच्या १७ कर्मचाऱ्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र बोगस आढळल्याचे वृत्त बाहेर येताच प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. दरम्यान, जिल्हा रुग्णालयाकडून प्राप्त अहवाल आणखी सुस्पष्ट मिळावा, यासाठी झेडपीतून पुन्हा पत्रव्यवहार केला जाणार आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर लागलीच संबंधितांवर कारवाई सुरू केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून समजले.

जिल्हा परिषदेच्या २०३ कर्मचाऱ्यांना दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवले होते. त्याचा अहवाल नुकताच झेडपी प्रशासनाला प्राप्त झाला आहे. यामध्ये १७ कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राचा आणि त्यांची शारीरिक तपासणी



केल्यानंतर 'तसा' काहीही संबंध नसल्याचे पुढे आले आहे.

त्यामुळे काही कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व हे '0 टक्के' असल्याचे तपासणी अहवालात स्पष्ट नमूद आहे. अनेकांचे केसपेपर, यूडीआयडी अशी कागदपत्रे जिल्हा रुग्णालयात सापडलेली नाहीत. त्यामुळे हे प्रमाणपत्र संशयास्पद दिसले आहे.

मात्र, सीईओंना अहवालातील अभिप्राय गोंधळ निर्माण करणारे वाटले आहेत. त्यामुळे त्यांनी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांना जिल्हा आरोग्य प्रशासनाला पत्रव्यवहार करून या संदर्भात स्पष्ट अभिप्राय देण्याबाबत सूचना केल्याचे समजले. दरम्यान, जिल्हा रुग्णालयाने सर्व चौकशी अहवालात शेवटच्या काही ओळींमध्ये 'शून्य टक्के' दिव्यांगत्व असल्याचे नमूद केलेले असतानाही, आता जिल्हा परिषद प्रशासनाला यापेक्षा आणखी कोणता सुस्पष्ट अभिप्राय हवा आहे? याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# श्री ढोकेश्वर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे कर्जुले हरिया येथे उत्साहात उद्घाटन



**टाकळी ढोकेश्वर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज टाकळी ढोकेश्वर कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर कर्जुले हरिया येथे पार पडत आहे. या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पारनेर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री मारक साहेब, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उप कुलसचिव डॉ. अजय ठुबे ,अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, हरेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा दैनिक नगर सह्याद्रीचे संपादक श्री शिवाजी शिर्के, सरपंच सौ संगीताताई मुळे ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य प्रा. वीरेंद्र धनशेट्टी यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले.

याप्रसंगी बोलताना श्री मारक साहेब यांनी शिबिरातून विद्यार्थ्यांनी अनुभव घेऊन व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा तसेच उद्योग व व्यवसाय करून स्वतःच्या पायांवर उभे रहावे असे आवाहन केले तर डॉ.अजय दुबे यांनी शिबिराच्या नेटकेपणाने केलेल्या नियोजनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी श्रमदान करून परिसराचा विकास करण्यासाठी हातभार लावावा असे मत व्यक्त केले.

आपल्या स्वागतपर मनोगतात श्री शिवाजी शिर्के व सरपंच संगीता ताई मुळे यांनी ग्रामस्थ व देवस्थानकडून शिबिरास सर्वतोपरी सहकार्य करण्याची हमी दिली तसेच विद्यार्थ्यांनी गावाचा सर्वे करून गावच्या विकासात भर घालण्यासाठी काय करता येईल याबाबतचा अहवाल तयार करावा असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून विद्यार्थ्यांनी या शिबिरातून आपल्या कलागुणांचा विकास करून महाविद्यालयाचे नाव मोठे करावे असे मत व्यक्त केले.

# नांदेड–माहूरगड भव्य दिंडी व पालखी सोहळा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

श्री सद्गुरू समर्थ बाळगीर महाराज मठ संस्थान, गाडीपुरा (नांदेड) यांच्या कृपाशीर्वादाने व श्री.श्री.श्री १००८ अष्टकौशल्य सन्मानित सदगुरू समर्थ नारायण गिरी गुरु बाळगीर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने नांदेड ते माहूरगड या मार्गावर वर्ष ८ वे भव्य दिव्य पायी दिंडी व पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या दिंडी सोहळ्यामुळे नांदेडसह परिसरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. २५ जानेवारीपासून दिंडीचा प्रारंभ हा पवित्र सोहळा रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सुरू होणार असून रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याची सांगता होणार आहे.

# के. के. रेंजमध्ये भारतीय लष्कराचा सुखोई, हेलिकॉप्टर, रणगाडे, ड्रोनद्वारे युद्धसराव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भारतीय लष्कराचे रणगाडा दल (आर्मर्ड कोर सेंटर अँण्ड स्कूल), यांत्रिकी पायदळ (मेकानाईज इन्फंट्री सेंटर अँण्ड स्कूल), वायुदल, टेहळणी व मारक शक्ती म्हणून वापरले जाणारे अत्याधुनिक ड्रोन यांच्या संयुक्त सराव मोहिमेतून अचूक संहारक क्षमतेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

शत्रुच्या हालचालींची माहिती मिळवत, व्यूहरचना करून रणगाडे, लढाऊ चिलखती वाहने व त्यावरील जवानांनी कौशल्ये सादर केली. या सराव मोहिमेचे निरीक्षण करण्यासाठी देशभरासह मित्रराष्ट्रांचे सैन्याधिकारी उपस्थित होते.

नगर शहराजवळील के. के. रेंज (खारेकर्जूने, ता. अहिल्यानगर) येथील सराव क्षेत्रात ही प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. त्यास निमंत्रित उपस्थित होते. लष्कराच्या या सराव व्यूहरचनेत सुखोई



विमाने, हलक्या वजनाची हेलिकॉप्टर, स्वदेशी बनावटीचे स्वान, वज्र व कॉडकॉप्टर आदी ड्रोन, पॅरा स्पेशल फॉर्सेसचे जवान, टेहाळणी करणाऱ्या ड्रोनसह अर्जुन व भीष्म (टी-90), अजय (टी-72) हे प्रमुख युद्ध रणगाडे तसेच लढाऊ चिलखती वाहनांचा वापर करण्यात आला. आधुनिक युद्धभूमीवरील तंत्रज्ञान व मानवी कौशल्याचा संगम यामधून सादर करण्यात आला. यामध्ये रणगाडे व लढाऊ चिलखती वाहनांच्या चपळतेला महत्त्व देण्यात आले होते.

भारतीय लष्कराच्या ताफ्यातील प्रमुख रणगाड्यांच्या तोफांनी ८०० मीटर ते ५ हजार मीटरपर्यंतचा अचूक मारा करत लक्ष्यवेध केला. यामध्ये क्षेपणास्त्रांचाही वापर करण्यात आला. शहराजवळील के. के. रेंज परिसर भारतीय लष्कराच्या युद्धसराव अभ्यासासाठी राखीव आहे. तंत्रज्ञानाचा विकास होत असल्याने तसेच या सराव क्षेत्रात अडथळे निर्माण होऊ नयेत यासाठी गेल्या सप्टेंबरमध्ये जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर, पारनेर व राहुरी या तीन तालुक्यातील २३ गावांतील २५,६१० हेक्टर क्षेत्र पुढील पाच वर्षांसाठी प्रतिबंधित केले आहे.

सरावासाठी या परिसरात मनुष्य व पाळीव प्राण्यांनी प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. सरावाचा कालावधी दरवर्षी सुमारे तीन महिन्यांचा असतो. केवळ जमिनीवरूनच नव्हे तर हवेतही भारतीय लष्कराने आपले वर्चस्व दाखवून दिले. त्यासाठी आधुनिक काळातील युद्धनीतीचा भाग बनलेले स्वार्म ड्रोन व गुप्तचर देखरेख करणाऱ्या 'टोही प्लॅटफॉर्म' चा प्रभावी वापर सरावात दाखवण्यात आला. आत्मघातकी ड्रोन, हल्ला करून परतणारे ड्रोन, स्फोटके वाहून नेणारे ड्रोन याचाही वापर करण्यात आला. रशिया-युक्रेन युद्ध व तत्पूर्वी इस्राइल-पॅलेस्टाईन युद्धामध्ये ड्रोनचा प्रभावी वापर करण्यात आला.



# राष्ट्रवादीकडून प्रकाश भागानगरे यांना गटनेतेपद

## नाशिकच्या विभागीय आयुक्त कार्यालयात गटनोंदणी पूर्ण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

प्रकाश भागानगरे हे अहिल्यानगर महापालिकेत दुसऱ्यांदा नगरसेवक झाले आहेत. प्रकाश भागानगरे आणि सर्व राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक नाशिक येथे उपस्थित होते.

महापालिका निवडणुकीतील नगरसेवकांची नावे राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर काल भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी नाशिक येथे स्वतंत्र गटनोंदणी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी प्रकाश भागानगरे तर भाजपच्या गटनेतेपदी शारदा दिगंबर ढवण यांच्या नावावार शिक्कामोर्तब करण्यात आले.

नाशिक विभागीय आयुक्त यांच्यासमोर गट नोंदणी करण्यात आली.महापालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) २७ जागा मिळाल्या आहेत. तर भाजपला २५ जागा मिळाल्या आहेत. विजयी उमेदवारांची नावे मंगळवारी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून गटनोंदणीसाठी हालचाली सुरु झाल्या होत्या.

काल सकाळी भाजप - राष्ट्रवादीचे नगरसेवक एकत्रितपणेच नाशिकला रवाना झाले. गट नोंदणीच्या काही वेळ अगोदर राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी प्रकाश भागानगरे आणि भाजपच्या गटनेतेपदी शारदा दिगंबर ढवण यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसने स्वतंत्रपणे गटनोंदणी केली आहे.

# मेळाव्यास उपस्थित रहा

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

गोल्ला गोलेवार यादव समाज सेवा संघटना, जिल्हा नांदेड यांच्या वतीने शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे भव्य समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात समाजहितासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नामदेवराव आयलवाड यांनी केले आहे. सदर मेळावा आर्य वैश्य मंगल कार्यालय, वासवी माता मंदिराजवळ, लातूर फाटा, सिडको, नांदेड येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात उपवधू-वर परिचय मेळावा, सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती मेळावा, तसेच समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम, सेवानिवृत्त कर्मचारी, प्रगतिशील शेतकरी, यशस्वी उद्योजक, पदोन्नत कर्मचारी, तसेच पीएच.डी., सेट व नेट धारकांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# यशासाठी पालकांचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करा

- नवनिर्वाचित नगरसेविका अश्विनी कलगुटवार
- जिजाऊ–सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त राजकुंवर महिला महाविद्यालयात गौरव सोहळा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ आणि स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त राजकुंवर महिला महाविद्यालय, किनवट येथे अभिवादन कार्यक्रम व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी किरण कलगुटवार हिची किनवट नगरपालिकेच्या नगरसेविकापदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित नगरसेविका अश्विनी कलगुटवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, "माझ्या जडणघडणीत राजकुंवर महिला महाविद्यालयाचे आणि ॲड. सुनील येरेकर यांच्या मार्गदर्शनाचे मोलाचे योगदान आहे. माझ्या राजकीय यशाचे श्रेय माझे वडील किरण कलगुटवार यांना जाते." उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, "डॉक्टर, इंजिनीअर किंवा प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न असेल, तर पालकांचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम आणि त्याग करण्याची तयारी ठेवावी लागते. पालकांचे पाठबळ मिळाल्यास कोणत्याही क्षेत्रात यश निश्चित साध्य करता येते." कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ॲड. सुनील येरेकर यांनी महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "ग्रामीण भागातील मुलींना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे, त्या स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभ्या राहाव्यात, यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थिनींच्या अंगभूत गुणांना वाव देत त्यांना स्पर्धात्मक दृष्टिकोनातून घडवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे." यावेळी किरण कलगुटवार यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना परिश्रम, जिद्द आणि सातत्य यांच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करून यश मिळवता येते, असे प्रतिपादन केले.

गृहलक्ष्मी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्षा संगीताताई पाटील यांनीही मनोगत व्यक्त करताना, महिलांनी आपली सामाजिक भूमिका ओळखून आत्मविश्वासाने काम केल्यास यश साध्य करणे सहज शक्य असल्याचे सांगितले.

# 'आजचा दिवस माझा' चित्रपट पाहताना लोकाभिमुख नेतृत्वाची आठवण!

## सिनेमातील संवेदनशील मुख्यमंत्री आणि वास्तवातील बॅरिस्टर अंतुले यांचा समान धागा!





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**(समर्थ गांवकरी)**

नुकताच पुन्हा पाहण्यात आलेला मराठी चित्रपट आजचा दिवस माझा आजही प्रेक्षकांना अंतर्मुख करतो. २९ मार्च २०१३ रोजी प्रदर्शित झालेला हा चित्रपट राजकारण, प्रशासन आणि सामान्य माणसाच्या न्यायासाठीची लढाई प्रभावीपणे मांडतो. सत्ता म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर सेवा आणि जबाबदारी असते, हा संदेश चित्रपट ठळकपणे देतो.

या चित्रपटात सचिन खेडेकर आणि महेश मांजरेकर यांच्या दमदार अभिनयामुळे कथानक अधिक परिणामकारक ठरते. चित्रपटातील एका महत्त्वाच्या दृश्यात मुख्यमंत्री हे नजरचुकीने एका वृद्ध व अंध गायकाचा अपमान करतात. मात्र आपली चूक लक्षात येताच, सत्तेचा अहंकार बाजूला ठेवून ते त्या कलाकाराला न्याय मिळवून देण्यासाठी थेट पुढाकार घेतात. त्या वृद्ध गायकाला त्याच्या हक्काचे घर मिळावे आणि त्याच्यावर झालेला अन्याय दूर व्हावा यासाठी मुख्यमंत्री रात्री उशिरा मंत्रालय उघडण्याचा निर्णय घेतात. हे दृश्य केवळ सिनेमॅटिक न वाटता, संवेदनशील आणि लोकाभिमुख प्रशासनाचे प्रतीक ठरते.

हा प्रसंग पाहताना अनेक प्रेक्षकांच्या मनात महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एक ठळक व्यक्तिमत्त्व आठवते, बॅरिस्टर ए. आर. अंतुले. गरीब, वंचित आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे उभे राहणारे नेतृत्व, गरज पडल्यास प्रशासनाला तत्काळ हालचाल करण्यास भाग पाडणे, ही अंतुले यांची ओळख राहिली आहे. त्यामुळे चित्रपटातील मुख्यमंत्री पात्र आणि बॅरिस्टर अंतुले यांच्या लोकाभिमुख भूमिकेत प्रेक्षकांना सहज साधर्म्य जाणवते.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांचे नाव एक प्रभावी, अभ्यासू पण वादग्रस्त नेतृत्व म्हणून नोंदले गेले आहे. ९ जून १९८० रोजी त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली आणि १२ जानेवारी १९८२ पर्यंत त्यांनी हे पद भूषवले. अल्पकालीन असला, तरी हा काळ सामाजिक न्याय, ग्रामीण विकास आणि राजकीय वादांमुळे विशेष चर्चेत राहिला. मुख्यमंत्री म्हणून अंतुले यांनी सामाजिक न्यायाला केंद्रस्थानी ठेवले. मागासवर्गीय, अल्पसंख्याक, शेतकरी आणि कष्टकरी वर्गासाठी योजना राबवण्यावर त्यांचा भर होता. शिक्षण, रोजगार आणि संधींचे समान वाटप या मुद्द्यांवर त्यांनी ठाम भूमिका घेतली. मुस्लिम समाजातून आलेले महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी सामाजिक सलोखा आणि सर्वसमावेशकतेचा स्पष्ट संदेश दिला.

ग्रामीण विकासाच्या बाबतीत त्यांनी सहकार चळवळीला चालना देण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देत कृषी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. सामान्य माणसाशी थेट संवाद साधणारा, लोकांमध्ये मिसळणारा नेता अशी त्यांची ओळख या काळात अधिक ठळक झाली.

मुख्यमंत्रीपदाच्या काळातच Antulay Trust प्रकरण उफाळून आले. औद्योगिक परवाने आणि शासकीय सवलती देताना देणग्या स्वीकारल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. या प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. अखेर नैतिक जबाबदारी स्वीकारत त्यांनी १२ जानेवारी १९८२ रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. पुढील न्यायालयीन प्रक्रियेत काही मुद्द्यांवर त्यांना दिलासा मिळाला, तरी हा वाद त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील निर्णायक टप्पा ठरला.

मुख्यमंत्रीपदावरून पायउतार झाल्यानंतरही अंतुले राष्ट्रीय राजकारणात सक्रिय राहिले. त्यांनी केंद्रीय मंत्री म्हणून विविध महत्त्वाची खाती सांभाळली. संसदेत त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे, कायद्याचे सखोल ज्ञान आणि स्पष्टवक्तेपणा यामुळे ते वेगळे ठरले. गरीब आणि दुर्लक्षित घटकांचा आवाज संसदेत ठामपणे मांडणारा नेता अशी त्यांची ओळख निर्माण झाली.

'आजचा दिवस माझा' हा चित्रपट आणि बॅरिस्टर अंतुले यांचा राजकीय प्रवास, या दोन्हींचा समान धागा म्हणजे लोकाभिमुखता आणि न्यायासाठीची तत्परता. चित्रपटातील मुख्यमंत्री पात्र जसे एका दुर्बल व्यक्तीसाठी रात्री मंत्रालय उघडतात, तसेच वास्तवातील अंतुले यांनीही सत्तेचा उपयोग सामान्य माणसासाठी करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच हा चित्रपट पाहताना बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांची आठवण येणे, ही केवळ भावना नसून लोकाभिमुख, संवेदनशील नेतृत्वाची समाजाला असलेली अपेक्षा व्यक्त करणारी प्रतिक्रिया ठरते.

# अ.नगर जिल्हा बँकेला दोन कोटीची ठेवीचा धनादेश सुपूर्द

## पतसंस्थांचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा बँकेची सकारात्मक भूमिका - चंद्रशेखर घुले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यातील पतसंस्थेच्या मोठ्या प्रमाणात जिल्हा बँकेत ठेवी असल्याने एक टक्का व्याजदर वाढून मिळावा.पतसंस्थांच्या अडचणी संदर्भात स्वतंत्र कक्ष सुरू करावा.तसेच गोल्ड लोन री फायनान्स करावे.या पतसंस्थांच्या विविध मागण्यांचा विषयीचे निवेदन राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे,मल्टीस्टेट फेडरेशन पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश वाबळे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, फेडरेशनचे सल्लागार आर.डी. मंत्री, मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे संचालक कडुभाऊ काळे व अ.नगर जिल्हा स्थैर्य निधी, या विविध संघटनांच्या वतीने जिल्हा बँकेला देण्यात आले होते.

पतसंस्थांच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेऊन जिल्हा बँकेने तत्परतेने सोडविण्यासाठी संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. तसेच जिल्हा बँकेने सकारात्मक पाऊल उचलून पतसंस्थांच्या ठेवीवर पॉईंट ५० टक्के व्याजदर वाढवून देण्याचे ठरविले आहे. तसेच पतसंस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र कक्ष देखील सुरू करण्यात आला आहे.

रंगारगल्ली येथील पंडित दीनदयाळ पतसंस्थेला जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले यांनी सदिच्छा भेट दिली. यापसंगी पतसंस्थेच्या वतीने दोन कोटीच्या ठेवीचा धनादेश पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांनी जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले यांच्याकडे सुपूर्त केला. यापसंगी जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन माधवराव कानवडे,मॅनेजिंग डायरेक्टर रावसाहेब वर्पे ,राजीव गांधी पतसंस्थेचे चेअरमन अँड. उद्धवराव दुसुंगे,पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे मानद सचिव विकास पाथरकर, संचालक बाबासाहेब साठे, धनसंपदा पतसंस्थेचे सोनवणे, याज्ञवल्क्य नागरी पतसंस्थेचे सुधीर मुळे,अशोक शिंगवी, आर.डी.मंत्री,उद्योजक राजेंद्र चोपडा,पतसंस्था तालुका फेडरेशनचे अध्यक्ष किसनराव लोटके ,पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे व्यवस्थापक निलेश लाटे आदी उपस्थित होते. जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले म्हणाले,महाराष्ट्र ही सहकाराची भूमी आहे.अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पतसंस्थांचे मोठे जाळे आहे.पतसंस्थांना जिल्हा बँकेमध्ये ठेवी ठेवण्यासाठी प्रोत्साहन मिळावे.यासाठी दोन कोटीच्या ठेवी वर व्याजदर पॉईंट पन्नास टक्के वाढवून देण्यात येणार आहे.तसेच पतसंस्थांच्या विविध अडचणी व समस्या तत्पर सोडविण्यासाठी जिल्हा बँकेमध्ये एकल खिडकी योजना राबविण्यात येणार आहे. पतसंस्थांनी जिल्हा बँकेत मोठ्या प्रमाणात ठेवी ठेवाव्यात.यासाठी पॉईंट ५० टक्के व्याजदर वाढवून देण्यात आला आहे. यावेळी वसंत लोढा म्हणाले, जिल्हा बँकेने पतसंस्था विषयी सकारात्मक भूमिका घेतल्याने जिल्ह्यातील पतसंस्थांना असे आवाहन करतो की,पतसंस्थांनी आपल्या ठेवी जिल्हा बँकेत ठेवाव्यात. जिल्ह्यातील पतसंस्था,मल्टीस्टेट पतसंस्था तसेच नागरी पतसंस्था एकत्रित मिळून सहकारात चांगले काम करता येईल.याबाबतचे आश्वासन जिल्हा बँकेने दिले आहे.

# 'या' प्रक्रियेत पहिल्याच झालेल्या निवडणुकीत भाजप महिलेची गटनेतेपदावर निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




अहिल्यानगर येथील महापालिकेच्या राजकारणात भारतीय जनता पक्षाने नवा अध्याय सुरू केला असून पक्षाच्या नगरसेवक गटाची अधिकृत नोंदणी नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयात पूर्ण झाली आहे. या प्रक्रियेत भाजपच्या नगरसेविका शारदा दिगंबर ढवण यांची गटनेतेपदी निवड जाहीर केली आहे. अहिल्यानगर नामांतरानंतर धनगर समाजाला मिळालेले हे सर्वोच्च पद मानले जात असून स्वर्गीय दिगंबर ढवण यांना ही निवड श्रद्धांजली ठरत आहे. त्याचबरोबर भारतीय जनता पक्षाने महापालिकेत प्रथमच एका महिलेला गटनेतेपदाची संधी देत महिला नेतृत्वालाही ठोस व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांना प्रेरणा मानणाऱ्या पक्षाने धनगर समाजातील प्रतिनिधीस हे महत्त्वाचे पद देत शहरातील विविध समाज घटकांपर्यंत पोहोचण्याचा संदेश दिला आहे. ही निवड केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाची मानली जात आहे. शारदा दिगंबर ढवण या दिवंगत दिगंबर ढवण यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा वारसा पुढे नेत आहेत. त्या माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या समर्थक म्हणून ओळखल्या जातात. दिगंबर ढवण यांच्या निधनानंतर निवडणुकीच्या काळात स्वतः मैदानात उतरून केलेल्या प्रचारामुळे शारदा ढवण यांना मिळालेला जनसमर्थनाचा पाया आज गटनेतेपदाच्या रूपाने अधिक दृढ झाल्याचे दिसते. अहिल्यानगर महापालिकेत भाजपचे २५ नगरसेवक निवडून आले असून नामांतरानंतर हे पहिलेच गटनेतेपद आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर निर्णयक्षम आणि स्पष्ट नेतृत्व उभे राहत असल्याचे चित्र आहे. पक्षाच्या धोरणात्मक भूमिकांना महापालिकेत प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे.

# वयोवृद्ध महिलेला तलाठी असल्याची बतावणी करून फसवणूक करणाऱ्या गुन्हेगाराला केले जेरबंद

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**




पुणे जिल्ह्यातील बेल्हे (ता. जुन्नर) येथे एका ६८ वर्षीय वृद्ध महिलेला 'मी तुमचा तलाठी आहे' अशी खोटी बतावणी करून लुबाडण्यात आलं.

आता महिलेला लुबाडणाऱ्या सराईत गुन्हेगाराला आळेफाटा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पेन्शन वाढवून देण्याचे आमिष दाखवून आरोपीने महिलेचे सोन्याचे दागिने लंपास केले होते.

पारनेर तालुक्यातील डोंगरवाडी येथील उल्हासाबाई संतू डोंगरे (वय ६८) या काही दिवसांपूर्वी बेल्हे येथील बँक ऑफ इंडियामध्ये गेल्या होत्या. तिथे आरोपी ज्ञानदेव हरिभाऊ चेडे (वय ४५, रा. अहिल्यानगर) याने त्यांना गाठले. "मी तुमच्या गावचा तलाठी आहे, तुमची पेन्शन वाढली आहे," असे सांगून त्याने त्यांचा विश्वास संपादन केला. वाढीव पेन्शन मिळवण्यासाठी काही प्रक्रिया करावी लागेल आणि पैसे भरावे लागतील, असे सांगून त्याने वृद्ध महिलेचे सोन्याचे दागिने काढून घेऊन पोबारा केला.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने आळेफाटा पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास चक्रे फिरवून आरोपी ज्ञानदेव चेडे याला अटक केली. तपासादरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याच्याकडून १ लाख ८१ हजार ९०० रुपये किमतीचे २७.१५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

# स्वप्न धुळीस

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथे आठवडी बाजार भरवावा अशी येथील पत्रकार धोंडीबा बोरगावे यांनी ता. २० जानेवारी २०२२ रोजी ग्राम पंचायत कडे लेखी निवेदन देऊन रीतसर मागणी केली होती. त्या मागणीवरून येथील ग्राम पंचायत ने ग्रामसभा घेऊन त्यात हा विषय ठेवून सर्वानुमते ठराव संमत करून घेतला. त्यानंतर सदर ठरावाची प्रत जोडून ग्राम पंचायत ने तहसीलवकार्यालय कंधार, कृषी उत्पन्न बाजार समिती कंधार यांच्याकडे लेखी निवेदन देऊन फुलवळ येथे आठवडी बाजार भरवण्यास परवानगी मागितली, त्या मागणीला कृषी उत्पन्न बाजार समिती व तहसील कार्यालय ची परवानगीही मिळाली असल्याने आता फुलवळ येथे आठवडी बाजार लवकरच भरणार अशी आशा येथील व्यापारी व ग्रामस्थांना होत्या.

# विविध समित्यांच्या सभापती निवड जाहीर करण्यात आल्या

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असलेल्या शिर्डी नगरपरिषदेच्या सत्तेत राज्याचे जलसंपदा राधाकृष्ण विखे पाटील यांनी महायुतीमधील सर्व घटक पक्षांना सामावून घेत राजकीय समतोल साधला आहे. सोमवारी पार पडलेल्या विषय समिती सभापती निवडीत भाजपसह राष्ट्रवादी आणि शिवसेना या तिन्ही पक्षांच्या नगरसेवकांना संधी देण्यात आली आहे. आगामी कुंभमेळ्याच्या भव्य नियोजनासाठी अनुभवाची जोड आणि युवा शक्तीचा उत्साह अशी सांगड घालत ना. विखे पाटलांनी शिर्डीच्या विकासाचा नवा रोडमॅप तयार केला आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत २३ पैकी १९ जागा जिंकून महायुतीने शिर्डीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. नगराध्यक्षपदी भाजपच्या जयश्रीताई थोरात यांची निवड झाल्यानंतर, आता उपनगराध्यक्षपदी पाच पंचवार्षिक निवडणुकांचा दांडगा अनुभव असलेले अभय शेळके यांची वर्णी लावून ना. विखे पाटलांनी शिर्डीच्या विकासाला व्हिजनरी नेतृत्व दिले आहे. स्वच्छ शिर्डी मोहिमेत राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळवण्यात शेळके यांचा मोठा अनुभव आता कुंभमेळ्याच्या कामात मैलाचा दगड ठरणार आहे

महायुतीमध्ये एकजूट कायम राखण्यासाठी ना. विखे पाटलांनी सभापतीपदाचे वाटप अत्यंत चपखलपणे केले आहे. अभय शेळके (नियोजन व विकास), भाजपचे अरविंद कोते (बांधकाम समिती), राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) दीपक गोंदकर (आरोग्य समिती), भाजपच्या कोमल बोराडे (पाणीपुरवठा) आणि शिवसेनेच्या (शिंदे गट) सुनीता वसंत गोंदकर (महिला व बालकल्याण) अशी ही नवी टीम शिर्डीचा कारभार पाहणार आहे. यामध्ये महिला आणि पुरुष नगरसेवकांना समसमान स्थान देऊन सामाजिक समतोलही राखण्यात आला आहे. आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी शहरात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची कामे प्रस्तावित आहेत. ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही नवनियुक्त समिती आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणार आहे. तीर्थक्षेत्राचा विकास, स्वच्छ आरोग्य आणि मुबलक पाणीपुरवठा या त्रिसूत्रीवर ही टीम काम करणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या निवडीमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शिर्डीच्या कायापालटाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# पुणतांब्यातील जुन्या के.टी. वेअरचे 'व्हर्टिकल बॅरेज' मध्ये रूपांतर करणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील : पाणीसाठ्यात २० टक्क्यांनी वाढ होणार

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

> श्री.विखे पाटील म्हणाले, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शासन कटिबद्ध असून स्मारकाच्या जागेचा प्रश्न प्रशासकीय स्तरावर तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचली असून, देश आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुणतांबा व परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पुणतांबा येथील जुन्या के.टी. वेअरचे आधुनिक 'व्हर्टिकल बॅरेज' मध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी अंदाजे ४० ते ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पामुळे पाणीसाठ्यात २० टक्क्यांनी वाढ होईल व पाण्याची गळती १०० टक्के थांबेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. तसेच शेतकऱ्यांना दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी पुणतांबा परिसरात ७६ एकर जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत असून, यामुळे पुणतांबा, नपावाडी, रामपूरवाडी व पिंपळवाडी या गावांतील शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्नही निकाली निघेल, अशी ग्वाही ही त्यांनी दिली. पुणतांबा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, उप विभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, दत्तू धोजे, डॉ. धनंजयराव धनवटे आदी उपस्थित होते. यावेळी 'राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने' अंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व आधुनिक कृषी अवजारांचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. जलसंपदा विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देताना श्री.विखे पाटील म्हणाले , गोदावरी कालव्याच्या १०० वर्षांच्या इतिहासात प्रथमच नूतनीकरण व सक्षमीकरणासाठी ४०० कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. वितरिका क्रमांक १८ आणि १९ च्या माध्यमातून कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. तसेच कोकणातून वाया जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून नगर जिल्ह्यासह संपूर्ण भाग दुष्काळमुक्त करण्यासाठी ९० हजार कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. यातून ८५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून, त्यातील ५५ टीएमसी जायकवाडी, १५ ते २० टीएमसी भंडारदरा व १५ टीएमसी पाणी मुळा धरणात सोडण्याचे नियोजन आहे.

शिर्डी एमआयडीसीमध्ये संरक्षण साहित्याचे उत्पादन करणारे 'हब' विकसित होत आहे. निबे समूहासारख्या उद्योगांमुळे आणि टाटा समूहाच्या २०० कोटींच्या अद्ययावत प्रशिक्षण केंद्रामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. हरेगाव येथे १७ हजार कोटींच्या गुंतवणुकीतून होणाऱ्या 'सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल' प्रकल्पामुळे १० हजार रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे.

तसेच शिर्डी विमानतळ विस्तारीकरणासाठी ७०० कोटींचा निधी देण्यात आला असून, एमआरओ सेंटरच्या माध्यमातून ५ हजार तरुणांना रोजगार मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

# महर्षी मार्कन्डेय जयंती साजरी

**नविन नांदेड: (समर्थ गांवकरी)**

नांदेड तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेली धनेगाव/मुजामपेठ ग्रामपंचायतचे सरपंच पिंटू पाटील शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय रित्या मार्कन्डेय जयंती साजरी करण्यात आली,तर दुध डेअरी चौक येथे महर्षी मार्कंडेय ऋषी नामफलाकाचे पूजन करण्यात आले यावेळी समाज बांधवांसह मान्यवर यांची उपस्थिती होती दि २१ जानेवारी रोजी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी धनेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे महर्षी मार्कंडेय ऋषी ही जयंती सभागृहात गेल्या पंधरा वर्षापासून नियमितपणे साजरी केली जाते.ही ग्रामपंचायत प्रत्येक ऋषी,महापुरुष व नेत्यांची जयंती साजरी करत असल्याने या ग्रामपंचायतचे सर्व स्तरातून कौतुक केल्या जात आहे. दि २१ जानेवारी रोजी जयंती निमित्त विणकर वसाहत,दुधडेरी येथील मंदिरामध्ये महर्षी मार्कन्डेय ऋषींच्या मूर्तीचा अभिषेक करून महाआरती करण्यात आली.



# सन १९९६-९७ बॅचमधील विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर संपन्न

**माढा तालुका : (समर्थ गांवकरी)**

माढा तालुक्यातील शरद विद्यालय बारलोणी या शाळेमध्ये सन १९९६-९७ बॅचमधील मुला मुलींचा गेट-टुगेदर संपन्न झाला .

प्रत्येक मुलांना फेटा बांधून शिक्षकांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रगीत सादर करून वर्गामध्ये प्रवेश केला या वेळी कार्यक्रमास उपस्थित असलेले विद्यार्थ्यां व शिक्षक नवनाथ नांदे , पोपट चव्हाण , विठ्ठल ननवरे , सुनील बागल , बाळासाहेब मोरे , सुरेश गपाटे इत्यादी शिक्षकांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मान्यवरांना विद्यार्थ्यांकडून फेटा बांधून गुलाब पुष्प व विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती ददेऊन सत्कार करण्यात आला यावेळी सण १९९६-९७ मधील विद्यार्थी एकत्र येऊन प्रत्येकाने आपापला परिचय दिला .

आणि प्रत्येक शिक्षकांनी मुलांना साठी मार्गदर्शन केले .

विद्यार्थ्यांच्या वतीने गेट-टुगेदर या कार्यक्रमास आलेल्या मान्यवरांना चहा व अल्प उपहार वाटप करण्यात आला. गेट-टुगेदर च्या कार्यक्रमास आलेला मुलांमुलीने केक कापून प्रत्येकाचा वाढदिवस साजरा करण्यात आला . सांस्कृतिक खेळ संगीत खुर्ची गाण्याच्या भेंड्या विविध प्रकारचे नृत्य सादर करून गेट-टुगेदर कार्यक्रम संपन्न झाला व सर्वांनी मिळून स्नेहभोजन चा स्वाद घेतला.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अनैतिक कृत्याचा प्रयत्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**


■ नगर तालुक्यातील घटना

नगर तालुक्यातील एका गावातून अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यासोबत अनैतिक कृत्य करण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना सोमवारी (१९ जानेवारी) दुपारी घडली आहे. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून चौघांविरूध्द अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण बापु दरेकर, हर्षल संतोष मुरूमकर, सर्वोजित दत्तात्रय मुरूमकर (तिघे रा. कोयाळ, ता. आष्टी, जि. बीड) व आदित्य अनिल वामन (रा. मांडवगण, ता. श्रीगोंदा) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींचे नावे आहेत. पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अहिल्यानगर तालुक्यातील एका गावातील विद्यालयासमोर सोमवारी दुपारी ३.१५ वाजेच्या सुमारास त्यांची मुलगी आपल्या मैत्रिणीसोबत उभी होती.

यावेळी दुचाकीवरून आलेल्या किरण दरेकर आणि हर्षल मुरूमकर यांनी तिला अनैतिक कृत्याच्या उद्देशाने गाठले. पीडितेच्या हाताला धरून तिला बळजबरीने दुचाकीवर बसवून एका गावाच्या दिशेने पळवून नेले. या गुन्ह्यात त्यांना सर्वोजित मुरूमकर आणि आदित्य वामन यांनी प्रोत्साहन देत साथ दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

# एक राजहंस

**(समर्थ गांवकरी)**



एका तळ्यात बदके आणि त्यांची गोंडस पिले राहत होती. त्यांच्यामध्ये मात्र एक वेगळेच पिल्लू होते—कुरूप, वेडेवाकडे दिसणारे. ते होते राजहंसाचे पिल्लू. १९व्या शतकातील लहान मुलांसाठी परीकथा लिहिणारे प्रसिद्ध लेखक हॅन्स क्रिश्चन अँडरसन यांच्या 'अग्ली डकलिंग' या कथेवरून प्रेरणा घेऊन, थोर साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेले हे अत्यंत भावस्पर्शी गीत आहे. बदकांच्या पिलांमध्ये वाढणाऱ्या राजहंसाच्या पिलाची ही कथा—एकटेपणाची, उपेक्षेची आणि आत्मशोधाची आहे.

बदकांची पिले लहान, गुटगुटीत व सुंदर दिसतात. त्याउलट राजहंसाच्या पिलाची चोच थोडी वक्र, मान उंच व बांधा वेगळा असल्यामुळे ते कुरूप वाटते. आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत, या भावनेतून ते दुःखी होते. मात्र एक दिवस पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहताना त्याला आपल्या खऱ्या अस्तित्वाची जाणीव होते—तो राजहंस आहे, हे त्याला उमगते. हाच या कथेचा गाभा आहे.

खरं तर आपल्या प्रत्येकात असेच एक 'कुरूप पिल्लू' दडलेले असते. कधी आपण दुर्लक्षित होतो, कधी डावलले जातो, तर कधी कमी लेखले जातो. अशा भावना प्रत्येकाच्या आयुष्यात कधीतरी डोकावतातच.

कुटुंबात चार भावंडे असतील, तर अनेकदा नकळत एखाद्या मुलाकडे दुर्लक्ष होते. जास्त हट्टी किंवा सतत रडणाऱ्या मुलांकडे अधिक लक्ष दिले जाते, तर शांत किंवा समजूतदार मुलांना "तुला कळत नाही" असे म्हणून कमी लेखले जाते. अशा वागणुकीचा लहान वयातच मुलांच्या मनावर खोल परिणाम होतो. 'आपल्यात काहीतरी उणीव आहे' ही भावना न्यूनगंडाला जन्म देते आणि आत्मविश्वास कमी होऊ लागतो. बालपणीचे हे अनुभव आयुष्यभर मनावर ठसे उमटवू शकतात.

पुढे समाजात वावरताना अनेकांना विविध सामाजिक अपप्रवृत्तींचा सामना करावा लागतो—जाणीवपूर्वक वेगळे पाडणे, गट करून अपमान करणे, रॅगिंगसारख्या घटना. अशा वागणुकीचे बळी ठरणारे अनेकजण मानसिकदृष्ट्या खचतात. नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव, जगण्याची इच्छा संपणे अशा गंभीर परिणामांपर्यंत ही प्रक्रिया जाऊ शकते. यातून बाहेर पडण्यासाठी कुटुंबाचा आधार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. लहानपणापासूनच मुलांना मानसिक आधार देणे आणि त्यांना सक्षम बनवणे ही कुटुंबातील मोठ्यांची जबाबदारी आहे.

वाचकहो, आपण कितीही मोठ्या पदावर असलो तरी आपण प्रथम आपल्या मुलांचे आई-वडील आहोत, हे विसरता कामा नये. आई-वडील असणे म्हणजे केवळ नाते नव्हे, तर एक मोठी जबाबदारी आहे. मुलांच्या मनात डोकावून पाहिले, तर त्यांच्या भावविश्वातील अनेक पैलू उलगडू शकतात. आज पूर्वीसारखी आजी-आजोबांची साथ कमी होत चालली आहे. त्यामुळे अनेक मुले एकटी पडत आहेत. न्यूनगंड, भीती आणि निराशा वाढत असून आत्मविश्वास कमी होत आहे. याचे अंतिम फलित अनेकदा अपयशात दिसून येते.

मी स्वतः एक शिक्षिका आहे. जेव्हा मी माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांना हे गीत ऐकवले, तेव्हा त्यांच्या डोळ्यांत पाणी आले—आणि माझ्याही. खात्रीने सांगते, हे गीत ऐकताना कुणाच्याही डोळ्यांत अश्रू तरळल्याशिवाय राहणार नाहीत. या गीतात दडलेला खोल अर्थ मनाला हुरहूर लावतो.

एक शिक्षिका म्हणून, जेव्हा मी विद्यार्थ्यांच्या भावविश्वात डोकावते, तेव्हा मला अनेक वेडी, कुरूप पिल्ले दिसतात. आणि मग मी ठरवते—ज्या क्षणी त्या पिल्लाने पाण्यात आपले प्रतिबिंब पाहून आपण राजहंस आहोत, हे ओळखले; त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या स्वत्वाची जाणीव करून देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हेच माझे ध्येय आहे. न्यूनगंडाला अभिमानात, आणि अभिमानाला स्वाभिमानात रूपांतरित करता आले, तरच मी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने एक आदर्श शिक्षिका ठरेन.

पाण्यात पाहताना
चोरूनिया क्षणेक
त्याचेच त्या कळाले
तो राजहंस एक.

लेखिका : सौ. पल्लवी संजय आल्हाट, श्रीरामपूर
मोबाईल : ८०१०९१२२९५

# हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हास्तरीय स्पर्धा उत्साहात संपन्न

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

नांदेड हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या गौरवशाली इतिहासाची, अतुलनीय बलिदानाची व समाजहितासाठी केलेल्या कार्याची माहिती सर्वसामान्यांपर्यंत, विशेषतः विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने नांदेड येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत जिल्हाभरातील शाळांमध्ये



चित्रकला, वक्तृत्व, गायन व निबंध अशा चार प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. शालेय व तालुकास्तरावरील निवड प्रक्रियेनंतर प्रत्येक तालुक्यातून प्रत्येक स्पर्धेसाठी तीन विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आले होते.

मंगळवार दिनांक २० जानेवारी रोजी नांदेड येथील गुरु ग्रंथसाहेबजी भवन येथे या जिल्हास्तरीय स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. सदर कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी उपस्थित राहून स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या कलागुणांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. या स्पर्धांचे कामकाज जिल्हा निवड समिती यांच्या देखरेखीखाली पार पडले. समितीमध्ये डॉ. अमोल निळेकर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, शिक्षण विस्तार अधिकारी रोहिदास बस्वदे यांचा समावेश होता.

तसेच सचखंड पब्लिक स्कूलचे प्राचार्य अनिल कौर खालसा यांनी गुरु ग्रंथसाहेबजी भवन व आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

या स्पर्धेतून निवड झालेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

---

तामसा प्रतिनिधी हदगांव तालुक्यातील कालवा दुरुस्तीचे काम लवकर व्हावीत म्हणून राज्याचे जलसंपदामंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी हदगांव तालुक्यातील कालवा दुरुस्ती चे काम लवकर व्हाहे, व शेतकऱ्यांना रब्बी हंगामात वेळे वर पाणी मिळावं या साठी निवेदन देऊन मागणी केली व जिल्हा परिषद आष्टी दिनदर्शिका २०२६ भेट दिली.. यावेळी हदगाव तालुक्यातील जलसंपदा विभागमार्फत कालवा दुरुस्तीचे कामे लवकर व्हावीत व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना वेळेवर पाणी मिळावे यासाठी निवेदन दिले.. यावेळी मराठा उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, शंकरराव पवार,मनोज जाधव उपस्थित होते.



---

## थोडक्यात बातम्या...




### गावे जलसमृद्ध व स्वच्छ ठेवण्याचे आवाहन - मयूर आंदोलवाड

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातंर्गत गाव पातळीवर पाणी व स्वच्छतेची कामे प्रभावीपणे राबवून गावे जलसमृद्ध व स्वच्छ ठेवण्याचे आवाहन जलजिवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूर आंदेलवाड यांनी केले. जलजीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हा परिषद नांदेड येथे नुकताच घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्सूनपूर्व व मान्सूनपश्चात पाणी तपासणी, फील्ड टेस्ट किटव्दारे पाणी गुणवत्ता चाचणी, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, पाण्याचा ताळेबंद, जल सेवा आकलन तसेच पाणी स्त्रोतांचे बळकटीकरण आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, आरोग्य विस्तार अधिकारी, पंचायत विस्तार अधिकारी, आरोग्य विभागाचे पर्यवेक्षक, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच भूजल सर्वेक्षण प्रयोगशाळेचे तंत्रज्ञ उपस्थित होते.

### प्रथमच पालघर जिल्हात साकारणार आहे बुद्धगया - महाबोधी महाविहार



भिवंडी (स. गांवकरी) : तथागत भगवान बुद्धांना जिथे ज्ञानप्राप्ती झाली असे विश्वाचे वंदनीय ठिकाण म्हणजे बुद्धगया महाबोधी महाविहार याची प्रतिकृती महाराष्ट्रात प्रथमच पालघर जिल्ह्यात साकारणार आहे बुद्धगया महाबोधी महाविहार प्रतिकृती म्हणजे महाबोधी विहाराची नक्कल किंवा छोटी रूपे जगभरातील बौद्ध विहारांमध्ये आणि धार्मिक स्थळांवर आढळतात जसे की थट्टा थट्टाहा महाबोधी पॅगोडा आणि थायलंड मधील काही विहारी आहेत जे बोधगयेतील मूळ विहारांची प्रतिकृती आहे . ठिकाण नारा फाटा ,भिवंडी वाडा रोड , तालुका - वाडा , जिल्हा- पालघर येथे प्रतिकृतीचे नुकतेच भूमिपूजन पार पडले या विहारात वाचनालय , विपश्यना केंद्र असणार आहेत आणि बौद्ध धम्माचा प्रचार - प्रसार वाढावा म्हणून भिक्खु निवास देखील असणार आहे स्मृतीशेष भंते जिवंत धम्मो यांनी ही संकल्पना निर्माण केली होती हे विहार वाडा व भिवंडी तालुका साठी धम्म सेंटर असेल व भविष्यात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून हे महत्त्वपूर्ण ठिकाण ठरेल, हे काम पूर्णत्वास नेण्याकरता बहुजन हिताय फाउंडेशन आणि श्रावस्ती बौद्ध शिक्षण संस्था नारे या दोन्ही नोंदणीकृत संस्था पुढाकार घेऊन काम पूर्णत्वास नेणार आहे भूमिपूजनाच्या दिवशी विहारा करता दान देण्याचे आवाहन करण्यात आले तेव्हा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वसंत लक्ष्मण सोनवणे यांनी ६६,६६६/- रू. धम्मदान घोषित केले त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले त्याप्रसंगी अशोक जाधव ,रमेश भोईर , नरेश जाधव, नालंदा जाधव,रमेश थूले ,विनीत सोनावणे ,योगेश मोहिते, वैभव साळवे ,विजय साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.




### जीवनात ध्येयपूर्तीसाठी कष्ट हाच एकमेव मार्ग-पोलीस निरीक्षक विलास पुजारी

पाथर्डी (स. गांवकरी) : बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित इयत्ता बारावीचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "जीवनात ध्येयपूर्तीसाठी कष्ट हाच एकमेव मार्ग आहे. संत साहित्याचा अभ्यास करा, आई-वडील व देशाची सेवा करा. ध्येय निश्चित करून ध्येयप्राप्तीसाठी अविरत प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते." या कार्यक्रमप्रसंगी स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद मेढे यांनी "मोबाईलपासून दूर राहा. मोबाईल चार्ज करण्यापेक्षा माणुसकीला चार्ज करा, आयुष्य सुंदर होईल" असा मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण-तणाव न घेता योग्य नियोजन करून परीक्षेला सामोरे जाण्याचा सल्ला दिला. तसेच उत्तम यशासाठी सातत्य, कष्ट व प्रामाणिकपणा आवश्यक असल्याचे सांगून, जीवनात येणाऱ्या अडचणींना धैर्याने सामोरे जावे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत समाजोपयोगी नागरिक बनण्याचा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाची सुरुवात गर्जे प्रतीक्षा,पाठक वैष्णवी यांच्या स्वागतगीताने झाली.

---

# विद्यार्थ्यांना आईच्या कष्टाची जाणीव व्हावी

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, व्यक्तिमत्व विकास होऊन त्यांच्यात व्यवहार चातुर्य यावे यासाठी नेहमीच विविध उपक्रम राबवणाऱ्या जामखेड शहरातील

नविन मराठी प्राथमिक शाळेत आज एक अनोखा व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला. त्यानुसार आधुनिक काळात शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना आईने बनवलेल्या स्वयंपाकाचे महत्व समजावे, त्यांनी आईला घरकामात मदत करावी, चुलीवर स्वयंपाक बनविताना किती कष्ट घ्यावे लागतात व अन्नाचे महत्व समजावे या उद्देशाने जामखेड शहरातील नविन मराठी प्राथमिक शाळेत इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः स्वयंपाक बनवण्याचा उपक्रम राबविला. या उपक्रमाचे सर्व



स्तरातून कौतुक होत आहे.

आजच्या आधुनिक काळात शिक्षण म्हणजे केवळ डिजिटल तंत्रज्ञान, कॉम्प्युटर आणि स्मार्ट बोर्डपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना आपल्या माती, परंपरा आणि संस्कृतीशी जोडणेही तितकेच आवश्यक आहे. हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरवत जामखेड शहरातील नविन मराठी प्राथमिक शाळेत एक अनोखा उपक्रम राबवला असून, काल दि. २० जानेवारी रोजी शाळेच्या प्रांगणात झालेल्या या उपक्रमा दरम्यान संस्थेचे उमेश (काका) देशमुख, राजेंद्र देशपांडे, नगरसेवक प्रविण सानप, सोमनाथ पोकळे, केदार रसाळ, नितीन राळेभात यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शाळेने राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच आज आम्हाला एक आगळावेगळा उपक्रम पहायला मिळाला आहे. विद्यार्थीना आईचे महत्व समजावे यासाठी हा उपक्रम घेतला त्यामुळे विद्यार्थी आईला त्रास देणार नाहीत असे वाटते. शाळेचे संचालक उमेश देशमुख यांनी सांगितले की, नवीन मराठी प्राथमिक शाळा असे उपक्रम नेहमी राबवते त्यामुळे विद्यार्थ्यांना एक नविन वेगळा अनुभव येतो. यावेळी केदार रसाळ यांनी देखील सांगितले की, या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जीवनाचे बाळकडू शिकवले जाते. विद्यार्थ्यांच्या व्यवहारीक ज्ञानात भर पडावी यासाठी एक दिवस कष्टाने पैसै कसे कमवायचे हा उपक्रम शाळेने राबवावा जेणेकरुन मुलं आई वडिलांकडे पैशाचा हट्ट धरणार नाहीत.

> नविन मराठी प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबवित असते. याच अनुषंगाने मुलांना अन्नाचे महत्व समजावे, आईने बनवलेल्या स्वयंपाकाची जाणीव व्हावी व मुलांनी घरी स्वयंपाक बनवताना मदत करावी, विषेश म्हणजे चुलीवर स्वयंपाक करताना किती कष्ट घ्यावे लागतात ही जाणीव मुलांना व्हावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे.
>
> **- सौ. मिनाताई राळेभात, मुख्याध्यापिका, नविन मराठी प्राथमिक शाळा.**

---

# श्री गणेश जयंती निमित्त धार्मिक कार्यक्रम

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट येथील श्री अष्टविनायक गणेश मंदिरात गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी श्री गणेश जयंती मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात येणार आहे. या पावन पर्वानिमित्त मंदिराच्या वतीने सकाळी ठीक १०.०० वाजता महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला आहे.



गणेश जयंतीनिमित्त पहाटेपासून मंदिरात विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, श्री गणरायाची विधीवत पूजा, अभिषेक, आरती व भक्तिगीतांच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. परिसरातील तसेच तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री गणेशाचे दर्शन घेणार आहेत. श्री गणेश हा बुद्धी, समृद्धी व मंगलतेचा अधिपती मानला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या महाप्रसादाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री अष्टविनायक गणेश मंदिर, राजेंद्र नगर, किनवट येथील विश्वस्त व आयोजकांनी केले आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे राजेंद्र नगर परिसरात भक्तीमय व उत्साहाचे वातावरण निर्माण होणार असून, सर्व गणेशभक्तांनी कुटुंबासह उपस्थित राहून श्री गणरायाचे आशीर्वाद घ्यावेत, असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

---

# सिडको शिवाजी विद्यालयाची सहल कोकणकडे झाली रवाना

**नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)**

जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी संचलित शिवाजी विद्यालय सिडको,नांदेड शाळेची शैक्षणिक सहल कोकणला रवाना झाली. संस्थेचे अध्यक्ष यांनी हिरवी झेंडी दाखवून सहलीसाठी विद्यार्थ्यांना रवाना केले,विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे,अभ्यासक्रमाची प्रत्यक्ष जोड मिळावी,या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. सहल रवाना होताना शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पालक,शिक्षकांच्या उपस्थितीत सहलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने प्रवासास सुरुवात केली.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना ऐतिहासिक,शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देण्याची संधी मिळणार आहे.राज्य परिवाहन मंडळाच्या तीन एसटी बसच्या माध्यमातून १२८ विद्यार्थ्यांसह सहलीसाठी शाळेचे शिक्षक व कर्मचारी निरीक्षक म्हणून



विद्यार्थ्यांसोबत रवाना झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली आहे.शैक्षणिक सहल ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरते. यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढते, अनुभवविश्व समृद्ध होते व नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते, असे मत संस्थेचे अध्यक्ष यांनी व्यक्त केले. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक व्ही.एस. पाटील, समन्वयक प्रा.साहेबराव देवरे, सहशिक्षिकासौ.ए.जी.देगावकर, ए.के.जांबकर,एम. जी.स्वामी, सहल प्रमुख,एस. के.अनकाडे,आर.के.चंदनशिवे, गणेश जाधव.एन.पी.जाधव, एस.एन.देवकर ,पी.एस.जोगदंड व पालक उपस्थित होते.

---

# नाभिक समाजाच्या इतिहासात नवा अध्याय

- **स्वीकृत नगरसेवक प्रवीण सावरकर यांचा सहपत्नी सत्कार**
- **आमदार उमेश ऊर्फ चंदुभाऊ यावलकर यांचे नाभिक समाजाकडून आभार**

**वरुड : (समर्थ गांवकरी)**

नाभिक समाज हा समाजातील एक अविभाज्य घटक असूनही अनेक वर्षांपासून राजकीय प्रवाहापासून उपेक्षित राहिला होता. अल्पसंख्याक समाज असल्यामुळे या समाजाला राजकीय प्रतिनिधित्वाची संधी मिळत नव्हती. मात्र अमरावती जिल्ह्यातील वरुड–मोर्शी मतदारसंघाचे लोकनेते आमदार उमेश उर्फ चंदुभाऊ यावलकर यांनी नाभिक समाजातील एका सामान्य कार्यकर्त्यावर विश्वास दाखवत समाजाला मुख्य प्रवाहात आणले असल्याची भावना नाभिक समाज बांधवांनी व्यक्त केली.

वरुड नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवक पदी नाभिक समाजातील प्रवीण सावरकर



यांची निवड झाल्याबद्दल नाभिक समाज बांधवांच्या वतीने त्यांचा सहपत्नी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. ही निवड महाराष्ट्रातील नाभिक समाजासाठी ऐतिहासिक असून, प्रथमच सामान्य कुटुंबातील नाभिक समाजाचा कार्यकर्ता स्वीकृत नगरसेवक पदी निवडला गेल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील नाभिक समाजाने आमदार उमेश यावलकर यांचे मनापासून आभार मानले.

यावेळी नाभिक दुकानदार संघटनेचे तालुकाध्यक्ष रामकृष्णजी शिरूरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आमचा नाभिक समाज लहान असला तरी प्रत्येक समाजाच्या सुख-दुःखात आम्ही नेहमी सहभागी होत असतो. आज आमच्याही समाजाला राजकीय क्षेत्रात जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली असून यासाठी आमदार उमेशजी यावलकर यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आम्ही त्यांचे शतशः ऋणी आहोत."

संत नगाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे राजीव बाभुळकर यांनीही मनोगत व्यक्त करत सांगितले की, नाभिक समाज गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. मात्र प्रथमच समाजातील कार्यकर्त्याला राजकीय क्षेत्रात काम करण्याची संधी दिल्याबद्दल आमदार उमेश यावलकर यांचे सर्व नाभिक समाज बांधव आभारी आहेत.

सत्काराला उत्तर देताना प्रवीण सावरकर म्हणाले, "हा माझा वैयक्तिक सत्कार नसून संपूर्ण नाभिक समाजाचा सन्मान आहे. आमदार उमेशजी यावलकर यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला, त्यासाठी मी व माझा समाज आयुष्यभर ऋणी राहू. दूरदृष्टी, सर्वधर्मसमभाव आणि विकासाचा विचार करणारे नेतृत्व म्हणजे आमदार चंदुभाऊ यावलकर." असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाला नाभिक दुकानदार संघटना, संत नगाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, महाराष्ट्र नाभिक महामंडळ तसेच वरुड नाभिक महिला संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी रामकृष्ण शिरूरकर, राजीव बाभुळकर, रमेश माथुरकर, राजीव मिसळकर, रमेश आसोलकर, राजेंद्र धानोरकर, गणेश आंबुलकर, विष्णू आंबुलकर, उद्धवराव घावरे, सुरेशराव बोरकर, महेंद्रपंत तळखंडकर, माणिकदासजी बेलूरकर, धनराज तळखंडकर, विलास साखरकर, शुभम साखरकर, प्रफुल साखरकर, अशोकराव साखरकर यांच्यासह महिला संघटनेच्या अध्यक्षा वर्षा तळखंडकर, सचिव स्वाती धानोरकर, अंजली चौधरी, पुनम बाभुळकर, नीलम सावरकर व इतर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

---

# आंबेडकर स्मारकाच्या नूतनीकरणाला नगरपंचायतीकडून अडवणूक

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

पारनेर नगरपंचायत हद्दीतील अल्पसंख्यांक बहुल भागात शासनाकडून मंजूर झालेल्या विकासकामांना प्रशासकीय मंजुरीसाठी आवश्यक कागदपत्र देण्यात नगरपंचायत अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दिरंगाई व अडवणूक होत असल्याचा आरोप करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाइं आठवले गटाचे युवक तालुकाध्यक्ष प्रदीप नगरे व शहराध्यक्ष सुधीर सोनवणे यांनी प्रशासनाला प्रशासनाला निवेदन दिले आहे.



रिपाइं (आठवले गट) युवक तालुकाध्यक्ष प्रदीप नगरे, राजेंद्र करंदीकर, सुधीर सोनवणे, जीवन घंगाळे, सुधीर नगरे, सिद्धार्थ सातपुते, संजीवन सोनवणे, बबन उमाप, महेश उमाप, योगेश कांबळे, वैभव शिंदे, लोकेश सूर्यवंशी, संगम सोनवणे, निखिल गायकवाड, शरद नगरे, शुभम भिंगारदिवे, सनी सूर्यवंशी, संदेश सूर्यवंशी, राहुल सूर्यवंशी, रुपेश घंगाळे, यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

> पारनेर नगरपंचायतीकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विकासकामाला जाणीवपूर्वक अडवणूक केली जात आहे. आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या १० लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी रोखणे म्हणजे आंबेडकरी अनुयायांच्या अस्मितेवर हल्ला आहे.
>
> **- राजेंद्र उबाळे (तालुकाध्यक्ष, रिपाइं आठवले गट)**
>
> नगरपंचायत पदाधिकाऱ्यांनी राजकीय हेवेदावे आणि द्वेषापोटी आवश्यक कागदपत्रे जाणीवपूर्वक रोखली आहेत. हे पारनेरच्या सर्वांगीण विकासाला घातक आहे. आंबेडकर स्मारकाच्या सुशोभीकरणाला अडथळा आणणे म्हणजे तमाम आंबेडकरी अनुयायांच्या भावना दुखावणे आहे. आम्ही या आडमुठ्या धोरणाचा निषेध करतो.
>
> **- प्रदीप नगरे (युवक तालुकाध्यक्ष, रिपाइं आठवले गट)**

आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या सुशोभीकरण व नूतनीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असला तरी प्रशासकीय मंजुरीसाठी नगरपंचायतकडून आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे जाणीवपूर्वक रोखली जात आहेत.


या अडवणुकीमुळे आंबेडकरी अनुयायांच्या भावना दुखावल्या जात असून, हे लोकशाही व शहराच्या विकासाच्या विरोधात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. राजकीय हेवेदावे व द्वेषापोटी ही दिरंगाई होत असल्याचा आरोप आहे. पारनेर नगरपंचायतीच्या काही दक्ष नगरसेवकांनी गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी बेमुदत उपोषणाचे आंदोलन करण्याचे ठरवले आहे.

शासनाने त्वरित दखल घेऊन कारवाई न केल्यास २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी नगरपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाचे जनआंदोलन सुरू केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. तमाम आंबेडकरी अनुयायी व पुरोगामी संघटनांच्या वतीने याला जाहीर पाठिंबा दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# युवकांना दिशा देणारा सन्मान

- स्व. शंकरराव पवार प्रतिष्ठानचा प्रेरणादायी समाजाभिमुख उपक्रम
- भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या भास्कर राठोड यांचा भव्य सत्कार



**मुखेड :** (समर्थ गांवकरी)

गरिबी, संघर्ष व अथक परिश्रम करून कष्टांवर मात करत भवानी तांडा (ता. मुखेड) येथील भास्कर बाबू राठोड, यांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल स्व. शंकरराव पवार, प्रतिष्ठान,भवानी तांडा यांच्या वतीने भव्य व भावनिक सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम युवकांना दिशा देणारा व समाजासाठी प्रेरणादायी ठरला.

अत्यंत सामान्य व कष्टकरी कुटुंबातून पुढे आलेल्या भास्कर राठोड, यांच्या यशामागे आई वडील यांचा सिंहाचा वाटा आहे मुलगा घडावा म्हणून ऊसतोड काम करून आपला उदरनिर्वाह चालवत मुलाला घडवलो अशी प्रतिक्रिया वडिलांनी दिली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रास्ताविक प्रा. निळू पवार, यांनी करून भास्कर राठोड, यांच्या संघर्षमय प्रवासावर प्रकाश टाकला.

या सत्कार समारंभात स्व. शंकरराव पवार, प्रतिष्ठानच्या वतीने भवानी तांड्याचे पोलीस पाटील (प्र.) अमर शंकरराव पवार, अजित शंकरराव पवार, तसेच रमेश पवार, गोविंद पवार, शिवाजी पवार, गणेश पवार व अंबादास पवार यांच्या हस्ते भास्कर बाबू राठोड, व त्यांच्या कष्टकरी आई-वडिलांचा पारंपरिक फेटा, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी भास्कर राठोड, यांच्या संघर्षाचे कौतुक करत युवकांनी शिक्षण, मेहनत, शिस्त व देशभक्तीच्या मार्गावर वाटचाल करावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले व्यंकटराव टेंभुर्णे पाटील, हाणमंत मामा वाडीकर, रामराव मस्कले, पत्रकार बाबुराव वाघमारे, जयपाल गायकवाड, संजय वाघमारे, (जिल्हा परिषद जांब सर्कल भावी उमेदवार), ज्ञानेश्वर डुमने, सूर्यकांत पाटील कुंद्राळकर, बाबू पाटील कुंद्राळकर, उमेश पाटील आखरगेकर (अभियंता), प्रा. निळू पवार, संजय शिवाजी पवार, संजय सोनकांबळे, रंजित बाऱ्हाळीकर, माधव होणमाने (आखरगा), दिंगबर फांतडे, संजय गोगे, पोलीस पाटील किशन पवित्रे, हणमंत पाटील (रोजगारसेवक, कुंद्राळ) यांच्यासह अंकुश राठोड, प्रवीण पवार, निरंजन डोईफोडे, शैलेश डोईफोडे, राम डोईफोडे व माधव वल्पवाड यांची उपस्थिती होती.

सूत्रसंचालन शिक्षक पांडुरंग सूर्यवंशी यांनी केले. भवानी तांडा व परिसरातील ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

# 'अबॅकस' कार्यशाळेचे यशस्वी आयोजन



**संगमनेर:** (समर्थ गांवकरी)

नवोदित शिक्षक प्रशिक्षणार्थी यांना गणितीय विषयाची योग्य ती ओळख होण्यासाठी व अध्यापनात आनंददायी शिक्षणाची पद्धत राबविण्यासाठी शिक्षण प्रसारक संस्थेच्या अध्यापक विद्यालयात अबॅकस या गणितीय प्रक्रियेचे प्रशिक्षण वर्गाचे यशस्वी आयोजन करण्यात आले या प्रसंगी अध्यापक विद्यालयातील प्राचार्या सविता घुलेसह कार्यशाळा संयोजक प्रणित धीवर व पुजा शेळके उपस्थित होते. या कार्यशाळेत प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी गणितीय उदाहरणांतून अध्यापन करण्यात आले. सदर अबॅकस हा मुलांच्या बौद्धिक क्षमतेसाठी व विचारप्रक्रिया वेगाने होण्यासाठी व त्यातून आत्मविश्वास वाढीस लागण्यासाठी योग्य असल्याचे प्रतिपादन कार्यशाळेतील प्रमुख वक्ते प्रियंका पठाडे यांनी सांगीतले. शिक्षणात वेगवेगळे बदल होत असून अबॅकस हे तंत्राच्या आधारे विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात या ज्ञानाचा वापर करून गणितीय अध्यापन हसतखेळत विद्यार्थ्यासमोर मांडू शकतात यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्यक्ष या तंत्राची ओळख व वापर करतांना संभाषण कौशल्याचे आधारे विद्यार्थांना बोलते करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रा. चंद्रकला सापनर, प्रा. कविता भोकनल, प्रा. सीमा कासार, प्रा. आकाश लकारे यांची उपस्थित होती. मोठ्या संख्येने विद्यार्थांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पुजा शेळके यांनी तर आभार प्रा. कविता भोकनल यांनी मांडले.

# जल जीवन मिशन अंतर्गत ठाणे जिल्ह्यात 'जल सेवा आंकलन' उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी

- ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कार्यक्षमतेचे ग्रामपंचायत नेतृत्वाखाली मूल्यांकन

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील कुटुंबांना नियमित, पुरेशा प्रमाणात व गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी शाश्वतपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी 'जल सेवा आंकलन' या ग्रामपंचायतच्या नेतृत्वाखालील मूल्यांकन साधनाचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. आतापर्यंत जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे कार्यक्षमता मूल्यांकन ठराविक कालावधीत तृतीय पक्ष सर्वेक्षणांद्वारे करण्यात येत होते. मात्र, गावपातळीवरील पाणी सेवांसाठी सतत, स्थानिक मालकीची व पारदर्शक देखरेख यंत्रणा संस्थात्मक करणे आवश्यक असल्याने 'जल सेवा आंकलन' या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. जल सेवा आंकलन म्हणजे गावातील पाणीपुरवठा सेवांची कामगिरी ग्रामपंचायत व गाव पाणी व स्वच्छता समिती यांच्या नेतृत्वाखाली पद्धतशीरपणे मूल्यांकन करणे होय. या उपक्रमाचे उद्घाटन दि. ३० डिसेंबर, २०२५ रोजी केंद्रीय मंत्री, जलशक्ती मंत्रालय, नवी दिल्ली सी. आर. पाटील, यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केले आहे.

या मूल्यांकनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंबांना पाणीपुरवठा नियमितपणे, पुरेशा प्रमाणात व स्वीकार्य गुणवत्तेनुसार मिळत आहे का, तक्रारींचे निवारण कसे होत आहे, वापरकर्ता शुल्क संकलनाची स्थिती, तसेच पाणीपुरवठा यंत्रणेची संचालन व देखभाल याबाबतची माहिती नोंदविण्यात येणार आहे.

जल सेवा आंकलनची प्रमुख उद्दिष्टे

- ग्रामपंचायत व गाव पाणी व स्वच्छता समिती यांना पाणीपुरवठा योजनांच्या कामगिरीचा पद्धतशीर आढावा घेण्यासाठी सक्षम करणे.
- गावपातळीवर मालकीभावना व जबाबदारी अधिक बळकट करणे.
- पारदर्शक व समुदाय-आधारित सेवा माहितीची खात्री करणे.

# कालव्याला ठिकठिकाणी गळती

**शिवनेरी :** (समर्थ गांवकरी)

कुकडी प्रकल्पातील पिंपळगाव जोगा धरणावर असलेल्या डाव्या कालव्यामधून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे . कालव्याच्या कडेला असलेल्या जमिनीमध्ये पाणी साचत असल्याने त्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे . त्यामुळे कालव्याचे लवकरच लवकर दुरुस्ती करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणावर असलेला कुकडी डावा कालवा हा पुणे व अहिल्यानगर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारा महत्त्वाचा कालवा आहे. या कालव्याला जवळपास १५ ते १६ वर्षे पासून ठीक ठिकाणी भेगा पडल्या आहेत .त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत आहे.

# आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत शाळा नोंदणीस मुदतवाढ

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

शिक्षण हक्क कायदा (Right to Education – RTE) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात शुक्रवार, दिनांक ०९ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांसाठी शाळा नोंदणी (School Registration) व शाळा पडताळणी (School Verification) साठी संबंधित संकेतस्थळावरील लिंक कार्यान्वित करण्यात आली होती. मात्र, दिलेल्या मुदतीत आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी शाळा नोंदणी




व शाळा पडताळणीचे काम शंभर टक्के पूर्ण झाले नसल्याने, मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांचे दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये या प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यानुसार, शाळा नोंदणी व शाळा पडताळणीसाठी दिनांक २० जानेवारी २०२६ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत अंतिम मुदत देण्यात आली असून, या कालावधीत संबंधित सर्व विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांनी आपली ऑनलाईन नोंदणी व शाळा पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. शाळा पडताळणी करताना विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरित (Relocated) झालेल्या शाळा या आरटीई कायद्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शाळांना ज्या शिक्षण मंडळाची (Board) मान्यता आहे, तेच मंडळ शाळा नोंदणी करताना निवडले आहे का, याची काटेकोर तपासणी करणे आवश्यक असून, कोणत्याही प्रकारची चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती नोंदवली जाणार नाही, याबाबत शाळा प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या संदर्भातील सूचना सर्व महापालिकांचे शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी तसेच पंचायत समितींचे गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या असून, आरटीई प्रवेश प्रक्रिया पारदर्शक, अचूक व वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, सदर कालावधीनंतर पुन्हा कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही समाजातील दुर्बल व वंचित घटकातील बालकांना दर्जेदार शिक्षण व समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असून, संबंधित शाळा प्रशासनाने या प्रक्रियेस गांभीर्याने घेऊन दिलेल्या अंतिम मुदतीत आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे बाळासाहेब राक्षे यांनी दिले आहेत.

# नगरसेवक सुनील सपकाळ यांचा तुकोबाराय शेतकरी गटाकडून सन्मान

**बुलडाणा :** (समर्थ गांवकरी)

राजकारणात विरोधकांना वैरी समजण्याचा काळ सुरू आहे. अशा वेळी इतरांच्या भावनांचा आदर करून प्रामाणिकते बरोबर साधेपणा जोपासणारे नगरसेवक सुनील सपकाळ खरी राजकीय संस्कृती जोपासत आहे. राजकीय चारित्र्य जोपासणारे ते सच्चे शिलेदार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य नंदू आप्पा बोरबळे म्हणाले. केळवद येथे तुकोबाराय शेतकरी गटाच्या वतीने नगरसेवक झाल्याबद्दल सुनील सपकाळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार संजय मोहिते,गणेश निकम, संदीप वानखेडे, बस्सी सर यांची उपस्थिती लाभली.

सर्वप्रथम बुलढाणा नगरपालिकेमध्ये स्वीकृत सदस्य पदी निवड झाल्याबद्दल तुकोबाराय शेतकरी गटाच्या



वतीने गोपाल वाघमारे, श्रीकृष्ण गवते, मनोज उन्हाले ,निलेश पाकारे, डॉक्टर आकाश सदावर्ते यांनी शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ सोबतच वैचारिक पुस्तकांची भेट देऊन नगरसेवक सुनील सपकाळ यांचा गौरव केला.

पुढे बोलताना आप्पाजी म्हणाले,राजकारण बहु आयामी आहे.कोणतीही विचारधारा असो किमान इतरांचा आदर करता आला पाहिजे.ही बेसिक पात्रता व अपेक्षा झाली.आजच्या राजकीय संस्कृतीवर नजर टाकली तर मोठी निराशा होते.राज्याला मोठी राजकीय संस्कृती आहे याच स्मरण करून द्यावे लागते. अशा वेळी नगरसेवक सुनील सपकाळ आशेचा किरण ठरतात. इतरांच्या भावनांचा आदर त्यांनी नेहमीच केला आहे.वैचारिक भूमिका हा त्यांच्या राजकारणाचा पाया राहिला.राजकीय चारित्र्य जोपासणारे गुरुजी त्यामुळे वेगळे ठरतात असे ते म्हणाले. तर हृदयापासून झालेला सन्मान माझ्यासाठी मोठा असल्याचे सत्कारमूर्ती नगरसेवक सुनील सपकाळ म्हणाले.मातीशी ईमान राखत कळ्या आईच्या साक्षीने केळवद वासियांनी केलेल्या सत्काराबद्दल त्यांनी ऋण व्यक्त केले.यावेळी जेस्ट पत्रकार संजय मोहिते,गणेश निकम,संदीप वानखेडे यांनी विचार व्यक्त केले. संचलन कैलास महामुने,

आभार गोपाल वाघमारे यांनी मानले.या वेळी केळवद ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली.

गेल्या पंचवीस वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असून राजकीय पदांपासून दूर राहिलेले सुनील सपकाळ यांना आमदार संजय गायकवाड यांनी राजकारणात स्टँड दिला. हिऱ्याची पारख करावी तसे त्यांनी अलगत त्यांना राजकीय मुख्य प्रवाहात आणले. एक प्रकारे सोनाराने हिऱ्याची पारखच केली आहे. भल्या माणसाला सक्रिय केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

# पाणीसाठ्यात २० टक्क्यांनी वाढ होणार

**शिर्डी :** (समर्थ गांवकरी)

पुणतांबा व परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पुणतांबा येथील जुन्या के.टी. वेअरचे आधुनिक 'व्हर्टिकल बॅरेज' मध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी अंदाजे ४० ते ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पामुळे पाणीसाठ्यात २० टक्क्यांनी वाढ होईल व पाण्याची गळती १०० टक्के थांबेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. तसेच शेतकऱ्यांना दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी पुणतांबा परिसरात ७६ एकर जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत असून, यामुळे पुणतांबा, नपावाडी, रामपूरवाडी व पिंपळवाडी या गावांतील शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्नही निकाली निघेल, अशी ग्वाही ही त्यांनी दिली.

# महिला सन्मान आठवड्यात विविध कार्यक्रमांचा जागर!

**बुलडाणा:** (समर्थ गांवकरी)

बुलढाण्यात महिला सक्षमीकरण चळवळीने चांगलाच जोर धरला आहे. यासाठी मानस फाउंडेशन व शिवसाई परिवाराने आठ दिवस विविध गावांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमांसोबतच वैचारिक,शारीरिक समस्या व कायदेविषयक सल्लाही दिला जाणार आहे. नांद्राकोळी येथे महिला बालविकास अधिकारी अमोल दिघोळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. बीरसिंगपूर येथे 25 जानेवारी अभियानाचा समारोप होत आहे. मकर संक्रांतीच्या निमित्ताने महिलांच्या हळदी कुंकू कार्यक्रमाचे ठीकठिकाणी आयोजन केले जाते. मात्र आजही या कार्यक्रमांमध्ये विधवा महिलांना सन्मानाने सहभागी करून घेतले जात नसल्याचे चित्र बहुतांश ठिकाणी पाहायला मिळते. विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत, एकल महिलांसाठी बुलढाण्यातील दत्तात्रय लहाने यांच्या संकल्पनेतून मानस फाउंडेशन काम करत आहे. सध्या सुरू असलेल्या हळदी कुंकू, आणि इतर सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांमध्ये विधवा घटस्फोटीत महिलांना सहभागी करून घेण्यासाठी मानस फाउंडेशन कडून आठवडाभर आठ गावांमध्ये जनजागृती अभियान राबवले जात आहे. याची सुरुवात बुलढाण्याच्या नांद्रा कोळी गावापासून करण्यात आली. नांद्राकोळी गावामध्ये जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी अमोल दिघुळे यांच्या अध्यक्षतेखाली हळदी कुंकू कार्यक्रम पार पडला.

दत्तात्रय लहाने आणि मानस फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी त्याचबरोबर गावातील सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, यासह विविध क्षेत्रात काम करणारे नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. 22 फेब्रुवारी रोजी जांभरुन येथे महिलांच्या आरोग्य विषयक समस्या यावर डॉक्टर माधवी जवरे विचार व्यक्त करणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.शाहीना पठाण राहणार आहे. 23 फेब्रुवारीला विशेष कार्यक्रम असून डॉक्टर कुणाल शेवाळे "मनोविकार" या विषयावर बोलणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य शाईना पठाण आहे. शिवसाई युनिव्हर्सल येथे 24 फेब्रुवारी रोजी महिलांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उज्वला काळे राहणार आहे. एडवोकेट वर्षा पालकर कायदेविषयक माहिती महिलांना देतील. अतिथी म्हणून नगराध्यक्ष सौ.पूजाताई गायकवाड व सौ. जयश्रीताई शेळके यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. 25 जानेवारी रोजी बिरसिंगपूर येथे होणाऱ्या समारोपिय कार्यक्रमात महिला सक्षमीकरण काळाची गरज या विषयावर राजश्री गायकवाड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



# हायवेवरील भारत गिअर कंपनीसमोर झाले डंपिंग ग्राउंड

- दुर्गंधीमुळे नागरिक हैराण

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

मुंब्र्यात हायवेवरील भारत गिअर कंपनीसमोर प्रचंड कचऱ्यामुळे डंपिंग ग्राउंड झाले आहे. भारत गिअर कंपनी समोरील हायवेवर मोकळ्या जागेत रस्त्यावर पालिकेच्या घंटा गाडीने डम्पिंग ग्राउंड केल्याने परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहें त्यामुळे पसरणाऱ्या दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले आहे. अधिक माहितीनुसार या रस्त्यावर टोरंट कंपनी सब स्टेशन जवळ कचरा टाकला जातो. घण्टा गाडीतून आणलेला कचरा या रस्त्यावर टाकून दिला जातो आणि नंतर दोन तीन दिवसांनी मोठा ट्रक येऊन कचरा घेऊन जातो मात्र मागील आठवड्यापासून येथील कचरा उचलला न गेल्याने सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे परिणामी परिसरातील नागरिकांना या दुर्गंधीचा त्रास होत आहे.

# संत सेना महाराज मंदिर विकासासाठी निधी दिला जाईल : मोनिका राजळे

## नाभिक समाज प्रतिष्ठान आयोजित नगराध्यक्ष, नगरसेवकांचा सत्कार

**पाथर्डी :** (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील सर्व संतांनी समाज उद्धारासाठी भरपूर कार्य केले आहे. संतांचे मानवाच्या जीवन घडणीमध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. संतांच्या कार्याचा मानवाला विसर पडू नये यासाठी संतांची मंदिरे ही समाजासाठी प्रेरणास्त्रोत आहेत यासाठी पाथर्डी शहरातील विजयनगर परिसरातील श्री संत सेना महाराज मंदिर विकासासाठी आगामी काळात भरपूर निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे प्रतिपादन शेवगाव पाथर्डी तालुक्याच्या आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांनी केले.

पाथर्डी शहरातील श्री संत सेना महाराज नाभिक समाज प्रतिष्ठान आयोजित पाथर्डी नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत विजयी झालेले नगराध्यक्ष अभय आव्हाड व सर्व नगरसेवक यांचा सत्कार नाभिक समाजाच्या वतीने नुकताच करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेवगाव पाथर्डी तालुक्याच्या कार्यसम्राट आमदार मोनिकाताई राजीव राजळे होत्या.

सत्कार प्रसंगी नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अभय आव्हाड म्हणाले, की सर्व नाभिक समाज आमच्या विचारांबरोबर आहे. शहरातील सर्व समाजातील जनतेला विचारात घेऊन पाथर्डी शहराचा पारदर्शक पद्धतीने कारभार करून उत्कृष्ट शहर निर्माण केले जाईल. शहरातील रस्ते, पिण्याचे पाणी, तसेच ओपन स्पेस विकास,आरोग्यदायी सुविधा यावर प्रामुख्याने लक्ष देऊन विकास केला जाईल. नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेना महाराज मंदिर विकासासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत यासाठी नगरपालिकेच्या माध्यमातून पुढील काळात भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल.

कार्यक्रमास आमदार मोनिकाताई राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे, गटनेत्या डॉ. शारदा गर्जे, नगरसेवक नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे, अमोल गर्जे, बजरंग घोडके, संजय देशमुख,डॉ. जगदीश माने, मनीषा उदमले, सुभाष बोरुडे,ज्योती पवार ,शारदा हंडाळ ,मंगल सोनटक्के, वर्षा मोरे, दिपाली बंग तसेच भाऊसाहेब मर्दाने, रामकिसन



पंडित, डॉ. प्रदीप वारूळकर, अंबादास शिंदे,भागवत गायके, अशोक शेळके तसेच समाजातील सर्व बंधू-भगिनी उपस्थित होते.

यावेळी संत सेना महाराज नाभिक समाज प्रतिष्ठान कार्यकारणी जाहीर करण्यात आली यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष दत्तात्रय वाघ, उपाध्यक्ष अमोल शिंदे,खजिनदार आजिनाथ पंडित व सचिव ज्ञानेश्वर गायके यांची निवड करण्यात आली. तसेच प्रा. प्रदीप वारुळकर यांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड शिक्षणशास्त्र या विषयात पीएचडी प्राप्त केल्याबद्दल समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश चातुर यांनी केले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके यांनी केले तर आभार शैलेश चातुर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय वाघ,अमोल शिंदे, आजिनाथ पंडित, अनिल पंडित,अरुण पंडित,भाऊसाहेब शेळके, योगेश कदम, विशाल पंडित, गणेश चातुर, विठ्ठल वखरे, अक्षय गायके , संतोष पवार,अमोल मर्दाने तसेच इतर सर्व समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.

# शरद पवार आणि राज ठाकरेंना मराठी मनाचा शोध लागेल?

राजकारणात काही व्यक्ती संस्था बनतात. त्यांची उपस्थिती केवळ निवडणुकीपुरती मर्यादित राहात नाही, तर समीकरणे त्यांच्या भोवती फिरतात. असे नेते निवडणूक जिंकतात म्हणून महत्त्वाचे ठरत नाहीत, तर ते राजकारणाची दिशा बदलतात म्हणून इतिहासात नोंदले जातात. शरद पवार आणि राज ठाकरे हे त्याच वर्गातील नेते! राज ठाकरे यांच्या नावावर निवडणुकांतील नेत्रदीपक यशाची नोंद भले नसेल; पण प्रत्येक निवडणुकीत त्यांची चर्चा होतेच! नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांनी त्या दोघांचाही राजकीय प्रवास एकाच टप्प्यावर आणून सोडल्याचे चित्र दिसते आणि तो टप्पा आहे अनिश्चिततेचा! शरद पवार केवळ एक नेता नाहीत, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक युग आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना, दिल्लीतील राजकारणात दबदबा आणि राज्यात जातीय, सामाजिक समतोल साधत सत्ता टिकवण्याची कला, हे केवळ पवारच करू शकतात. सहकार, ग्रामीण अर्थकारण, साखर उद्योग, शिक्षणसंस्था आणि दिल्लीतील सत्ताकेंद्रांशी असलेल्या सलगीच्या बळावर त्यांनी अनेकदा थेट सत्तेत सहभागी नसतानाही सत्ता नियंत्रित केली. परंतु, २०२३नंतरच्या घडामोडींनी या युगाचा शेवट जवळ आल्याचे संकेत दिले. ताज्या महापालिका निवडणूक निकालांनी त्यावर शिक्कामोर्तब केले की काय, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे विभाजन केवळ पक्षफूट नव्हे, तर पवारांच्या



## संपादकीय

राजकारणातील निर्णायक वळण ठरले. ते केवळ पक्षांतर्गत बंड नव्हते तर तो पवारांच्या राजकीय मॉडेलचा पराभव होता. त्यांनी कुटुंब, संस्था आणि निष्ठावान नेत्यांच्या बळावर स्वतःचे साम्राज्य उभे केले. पण, त्याच संरचनेतून त्यांना सर्वांत मोठा धक्का बसला. आज शरद पवारांकडे वैयक्तिक करिश्मा आहे, वैचारिक स्पष्टता आहे, अनुभव आहे; पण नाही ती संघटनात्मक धार! त्यांचे सर्वांत मोठे बलस्थान म्हणजे व्यापक संपर्क आणि राजकीय अनुभव! पण आज युवावर्गासाठी पवारांचे राजकारण केवळ स्मरणरंजन ठरत आहे, प्रेरणा नाही. शहरी मध्यमवर्गात त्यांची प्रतिमा 'चाणाक्ष, पण जुन्या पिढीतील नेते' इतकीच उरली आहे. पवारांपुढील खरे आव्हान राजकीय वारसा टिकवणे हे आहे. सुप्रिया सुळे यांच्याकडे दिल्लीत स्वीकारार्हता आहे; पण महाराष्ट्रात संघटना नाही. पक्ष टिकवायचा असेल तर पवारांना नव्या पिढीला निर्णयाधिकार द्यावा लागेल. त्यांचे राजकारण समजूतदार, समन्वयवादी आणि चर्चेवर आधारित आहे. मात्र, त्यांच्या दुर्दैवाने आजच्या मतदाराला ध्रुवीकरण, ठाम भूमिका आणि स्पष्ट शत्रू-मित्र समज अधिक भावते. शरद पवारांच्या तुलनेत राज ठाकरे यांचा प्रवास वेगळा. पण त्यांच्यापुढील पेचही तितकाच गंभीर आहे. ते महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वांत प्रभावी वक्त्यांपैकी एक! त्यांची भाषणशैली, मुद्देसूद मांडणी आणि व्यंगात्मक टीका आजही श्रोत्यांना खेचते. शिवसेनेतून बाहेर पडत महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन करताना दिसलेली त्यांची ऊर्जा आजही पूर्णतः संपलेली नाही. मात्र, त्यांचे राजकारण कायमच 'इव्हेंट-बेस्ड' राहिले आहे. एखादा मुद्दा, एखादी लाट, एखादा भावनिक उद्रेक आणि त्यानंतर दीर्घकाळ शांतता! सातत्याने संघटन वाढवणे, स्थानिक नेतृत्व घडवणे आणि निवडणूक व्यवस्थापन, याबाबतीत ते कमी पडले आहेत. त्यांच्या बाबतीत सर्वांत मोठा प्रश्न आहे भूमिकेतील सातत्याचा! कधी आक्रमक मराठी अस्मिता, कधी हिंदुत्वाकडे झुकाव, कधी भाजपविरोध, तर कधी अप्रत्यक्ष सहमती, अशा सतत बदलणाऱ्या भूमिकांमुळे त्यांचे कट्टर समर्थकही संभ्रमित होतात. त्यांचे विचार ऐकणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पण, मत देणाऱ्यांची संख्या मर्यादित! ते कधीच सत्तेचे राजकारणी झाले नाहीत आणि आज त्याची किंमत मनसेला मोजावी लागत आहे. निवडणुकांतील अपयशामुळे कार्यकर्त्यांमध्ये निराशा आणि त्यातून संघटनात्मक गळती हे दुष्टचक्र सुरूच आहे. तब्बल दोन दशकांनंतर उद्धव ठाकरेंशी जुळवून घेत मुंबई महापालिका निवडणूक लढवूनही पदरी दारुण अपयश आल्याने गळतीच्या प्रक्रियेला आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | 7 | 6 | | | 1 |
| | | | 1 | 2 | 8 | 5 | 9 | |
| | | | | 3 | | | | 6 |
| | | 3 | | | | 6 | 1 | 7 |
| | 6 | | 3 | 9 | 7 | | 4 | |
| 7 | 4 | 8 | | | | 9 | | |
| 2 | | | | 6 | | | | |
| | 1 | 4 | 8 | 5 | 3 | | | |
| 5 | | | 7 | 4 | | | | 8 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | 6 | 2 | 9 | 1 | 4 | 7 | 5 |
| 9 | 2 | 5 | 6 | 4 | 7 | 8 | 1 | 3 |
| 4 | 1 | 7 | 5 | 8 | 3 | 9 | 2 | 6 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 2 | 7 | 9 | 8 |
| 7 | 8 | 1 | 9 | 3 | 5 | 2 | 6 | 4 |
| 2 | 9 | 4 | 7 | 6 | 8 | 3 | 5 | 1 |
| 6 | 7 | 8 | 3 | 5 | 9 | 1 | 4 | 2 |
| 3 | 4 | 2 | 1 | 7 | 6 | 5 | 8 | 9 |
| 1 | 5 | 9 | 8 | 2 | 4 | 6 | 3 | 7 |

### पंचांग

२२ जानेवारी २०२५
गुरूवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:चतुर्थी २६:२८:३८+
नक्षत्र:शतभिषा
१४:२६:४३
योग:वारीयन १७:३७:१७
करण:वणिज १४:४०:५७
करण:विष्टि २६:२८:३८+
सूर्य:मकर
चन्द्र:कुम्भ

## उपदेशाचे डोस

### रुग्णसेवा

स्वामी विवेकानंद पाश्चात्य देशांचा प्रवास करून परत आले आणि त्यानंतर त्यांची प्रकृती खूपच खालावली. डॉक्टरांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला म्हणून ते दार्जिलिंगला गेले. तेथे असतानाच त्यांना बातमी समजली की, कलकत्त्यात प्लेगने हाहाकार माजवला आहे. हजारो लोक मृत्युमुखी पडले आहेत. आपण अशावेळी विश्रांती घेत बसणे पूर्णपणे चूक आहे असे स्वामीजींना वाटले. प्लेगच्या रुग्णांची सेवा करताना प्राण गेला तरी चालेल पण आपण ही रुग्णसेवा केलीच पाहिजे, असे ठरवून ते कलकत्त्यास परत आले. तेथे आल्यावर त्यांनी एक पत्रक काढून सर्वत्र वाटले. त्यात म्हटले होते की, ज्यांना कोणाला कोणत्याही प्रकारची मदत हवी असेल, त्यांना ती रामकृष्ण संघाकडून मिळेल. त्यांनी सेवापथके स्थापन केली आणि रुग्णांची शुश्रूषा करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले.

कथा उपदेश : जो आपले स्वतःचे दुःख विसरून दुसऱ्याच्या मदतीसाठी धावतो तो खरा समाजसेवक होय.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८३७ - दक्षिण सीरीयात भूकंपाने हजारो ठार.
- १९५६ - लॉस अंजेलीसमध्ये रेल्वे अपघातात ३० जण ठार.
- १९८८ - प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये ब्रायन लाराचे पदार्पण.
- १९८८ - प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये हॅन्सी क्रोनीएचे पदार्पण.
- १९९० - ॲडीलेड येथे कसोटीत वसीम अक्रमने शतक झळकवले. त्याने १२३ धावा केल्या.
- १९९४ - सुमात्रामध्ये ५.५ तिव्रतेचा भूकंप आला.
- २००७ - इस्त्रोचे अंतराळ स्पेस कॅप्सुल रिकव्हरी एक्सपिरिमेंट (एसआरई-१) यशस्वीरीत्या पृथ्वीवर परतले.

### राष्ट्रीय

- २००८ - मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कारासाठी सामाजिक न्याय व मानवी हक्कासाठी लढा देणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्या पद्मश्री तिस्ता सेतलवाड यांची निवड करण्यात आली.


### जन्म

- १५७९ - इंग्लिश नेते रॉबर्ट बरुस कॉटन यांचा जन्म.
- १८७४ - पोलंडचे पंतप्रधान वेनसेंटी वीटोज यांचा जन्म.
- १८९० - अमेरीकी सर्वोच्च न्यायालयाचे तेरावे सरन्यायधीश फ्रेड एम. वीनसन यांचा जन्म.
- १९७९ - ११९७ ची मीस स्वीटझरकलंड युनिव्हर्स मेलानी वीनीगर यांचा जन्म.

### निधन

- १५८१ - डॅच नेते सींप गलामा यांचे निधन.
- १९९२ - इराणचे पंतप्रधान अली अमीनी यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७३



**आडवे शब्द**

१. नमुना, मासला
३. वार्ताहर
७. चमकणारी बंगाली मिठाई?
१०. मिठी
१०अ. आस्था, प्रेम, माया
१२. मिठाला न जगणारा
१४. अंदाज करणे
१७. घाण
१८. 'आ'काराचे चिन्ह
१९. मांडणी, सजावट
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. ज्वारी-बाजरीचा पदार्थ
२५. वर्तमानपत्रातीक कप्पा
२७. शूर
२९. काचेला पडलेली चीर
३०. उलटसुलट आगबोटच!
३२. सैन्याचा मालपुरवठा
३४. प्रामाणिख, सोज्वळ
३६. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
३८. चामखीळ
४०. भरभराट
४१. डोंगरा किल्ला
४२. वाळा, ४३. घटस्फोट
४४. मगज
४५. प्रार्थना
४६. मंत्रीमंडळ
४८. गंध उगाळण्याचे जोडसाधन
५०. आजूबाजूला
५०अ. तोरा, माज
५१. जाणीव
५२. अब्रूदार
५५. महात्मा गांधीजींचे नाव
५७. दृष्टीभेट
६१. सदोदित
६३. जुनीच्या विरुद्ध
६५. राखण करणारा
६७. चटकन, त्वरित
६८. सज्जनगडचे संत
७१. गंध
७२. अर्धांगवायू
७३. गव्हाचे पीठ
७४. मालाची विक्री
७६. सडक
७७. बाळभाषते देव
७८. कणीदार
७९. फळांचे पेय

**उभे शब्द**

१. डोंगा
२. अननुभवी
३. थापा
४. माशाची रास
५. किंमत
६. दागदागिने
७. ओरखडा
८. माझे
९. चार आठवडे
१०. पुष्परस
११. सापाची एक जात
१३. ही पिऊन लगेच गोरेपणा थोडाच मिळणार!
१५. कोंबड्याचे आवरणे
१६. कारणाशिवाय
१८. उसाच्या रसाचा घट्ट रांधा
२०. नाला, खंदक
२२. हेतू, कारण
२३. चारी ठाव जेवणातील दोन प्रमुख पदार्थ
२४. पादत्राण
२६. नासाडी, विध्वंस
२८. चांदी
३०. जून, निबर
३१. हिशोब
३३. क्षुल्लक किंमतीचे नाणे
३५. पदरी सैनिक बाळगणारा
३६. झोपेचे खोबरे!
३७. हिचे चोचले पुरवणे म्हणजे अनारोग्याला आमंत्रण
३९. एकमेकांसमोर
४३. सावरीचा असल्यास सगळ्यात मऊ
४४. तारणपत्र
४५. कमिशन, दलाली
४६. श्रीमंत
४६अ. लोखंड घसण्याचे हत्यार
४७. राख
४८. शिक्षा
४९. झोपडी
५३. दानशूर
५४. मातीचा कण
५६. पोते शिवण्याची सुई
५८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
५९. खाण्याची तंबाखू
६०. पातळसर
६१. पंजाबमधील एक नदी
६२. समशेर
६३. अपुऱ्या नाकाची
६५. अफूचे बीज
६६. खटला, हक्क (सांगणे)
६९. दहावी रास
७०. पुरावा असल्यास पुरेसा भक्कम
७३. खण पण कापड नव्हे
७५. पंख, दुसऱ्याचा

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ७२ चे उत्तर

**आडवे उत्तर :** १.श्रीराम जयराम जयजयराम २.अट १२.हित १३.जनन १४.मम १५.रमावर १६.तबला १७.खस १८.तारा २०.रावण २२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा २९.खळखळाट ३०.दादला ३१.तुलसीदास ३३.मदन ३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल ३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल ४२.महाशय ४४.नफा ४६.पातक ४७.वार ४९.वाकडा ५२.कवच ५४.खरवस ५६.काजळी ५८.कडप्पा ५९.लामणदिवा ६०.रानटी ६२.सखी ६३.लगत ६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार ७०.बेकायदा ७२.डाकीण ७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा ७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण ८२.रातवा ८३.कारखाना

**उभे उत्तर :** १.श्रीमंत २.महिला ३.जत ४.राजस ५.मन ६.जनता ७.जम ८.यमराज ९.मरण १०.अवघड ११.टर १७.खसखस १९.रागीट २१.वरदान २३.पाखर २५.कलाकार २६.कमळ २७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस ३२.दारा ३३.मलम ३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा ३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा ५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार ६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत ६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन ७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा ८०.ताना

# देशातील २९६ नोडल सेंटर्समध्ये परिक्रमा पॉलिटेक्निकला अखिल भारतीय प्रथम क्रमांक प्राप्त

**श्रीगोंदा तालुका :** (समर्थ गांवकरी)

शिक्षण क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग आणि गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या परिक्रमा पॉलिटेक्निकने (काष्टी) आपल्या शिरपेचात मानाचे अनेक तुरे रोवले आहेत. शैक्षणिक उत्कृष्टतेसोबतच सामाजिक उत्तरदायित्वाचे भान राखत संस्थेने केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतून मोठी झेप घेतली आहे. व्हर्च्युअल लॅब्स (IIT Bombay) समन्वयाचे कौतुक IIT बॉम्बे अंतर्गत चालणाऱ्या 'व्हर्च्युअल लॅब्स' (Virtual Labs) उपक्रमाचे समन्वयन करणाऱ्या को-ऑर्डिनेटरच्या कार्याची दखल घेत त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना प्रगत प्रयोगशाळांचा अनुभव घरबसल्या मिळत आहे. व्हर्च्युअल लॅब्स नोडल सेंटर (MoE, भारत सरकार)परिक्रमा पॉलिटेक्निकला भारत सरकारच्या शिक्षण



मंत्रालयाअंतर्गत (NMEICT) राबविण्यात येणाऱ्या व्हर्च्युअल लॅब्स उपक्रमाचे अधिकृत नोडल सेंटर म्हणून मान्यता मिळाल्याचा आम्हाला अभिमान आहे.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे देशातील 296 नोडल सेंटर्समध्ये परिक्रमा पॉलिटेक्निकला अखिल भारतीय प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.*

व्हर्च्युअल लॅब्स मधे विद्यार्थी प्रत्यक्ष प्रयोग ऑनलाईन सिम्युलेशनद्वारे करू शकतात. कुठेही, कधीही प्रयोगांची पुनरावृत्ती करू शकतात

प्रयोगांची स्पष्ट समज, डिजिटल व कौशल्याधारित शिक्षण, CO-PO आधारित शिक्षणास मदत, खर्च, धोका व वेळेची बचत, राष्ट्रीय स्तरावरील ई-लर्निंग सुविधा यामुळे विद्यार्थ्यांना अनेक फायदे होणार आहे. MSBTE कडून 'Excellent' ग्रेड प्राप्त बाह्य शैक्षणिक संनियंत्रण समिती (EAMC - MSBTE) द्वारे करण्यात आलेल्या तपासणीत परिक्रमा पॉलिटेक्निकला 'EXCELLENT' ग्रेड बहाल करण्यात आला आहे

परिक्रमा पॉलिटेक्निक तंत्रशिक्षणात नवोपक्रम व गुणवत्ता यासाठी सदैव अग्रणी असते.याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारत सरकार, शिक्षण मंत्रालय आणि अटल इनोव्हेशन मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बिल्डाथॉन २०२५' (Buildathon 2025) अंतर्गत परिक्रमा पॉलिटेक्निकने ५ शाळा दत्तक घेतल्या आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण विचार रुजवण्यासाठी संस्था विशेष मार्गदर्शन करणार आहे

त्याच बरोबर 9 जाने. रोजी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई स्थापत्य अभियांत्रिकी गट नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभाग व परिक्रमा तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमान ने

राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत (State Level Quiz Competition) चमकदार कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. तांत्रिक ज्ञानासोबतच सामान्य ज्ञानाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी विविध फेऱ्यांमध्ये यश संपादन केले. या कार्यक्रमाला श्री. आशीष ए. निकम (विशेष कार्य अधिकारी, आरबीटीई, छत्रपती संभाजीनगर) डॉ. अजय एम. अगरकर (प्राचार्य, शासकीय पॉलिटेक्निक अहिल्यानगर) डॉ. दादा बी. करंजुळे (वरिष्ठ व्याख्याता, *शासकीय पॉलिटेक्निक अहिल्यानगर) उपस्थित होते.या आदरणीय मान्यवरांनी स्पर्धेच्या विद्यार्थ्यांना स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले. या मधे एकूण १३ महाविद्यालयांनी या प्रश्नमंजुषा स्पर्धेत भाग घेऊन स्थापत्य अभियांत्रिकीमधील आपली कौशल्ये आणि ज्ञान प्रदर्शित केले. यामध्ये प्रथम पारितोषिक श्री. हिरालाल हस्तीमल (जैन ब्रदर्स) पॉलिटेक्निक, चांदवड. महाविद्यालय तर द्वितीय पारितोषिक ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, नांदेड. या महाविद्यालयाने पटकावले.तर

उत्तेजनार्थ पारितोषिक संदीप पॉलिटेक्निक, नाशिक. महाविद्यालय ठरले.

IIT च्या वतीने घेण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील NPTEL अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी 'ELITE' आणि 'SILVER' मानांकन (Grade) प्राप्त करून आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

केवळ विद्यार्थीच नव्हे तर शिक्षकांनीही आपली कौशल्ये अद्ययावत ठेवली आहेत. NPTEL च्या 'मेंटॉर अचिव्हमेंट' कोर्समध्ये शिक्षक प्रमाणित झाले आहेत. तसेच, बोर्डाच्या परीक्षेत ज्या शिक्षकांच्या विषयांचा निकाल उत्कृष्ट लागला आहे, अशा 'टॉप स्कोरर' विषयांच्या शिक्षकांचा विशेष गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (MSBTE) जुलै २०२५ च्या न्यूजलेटरसाठी परिक्रमा पॉलिटेक्निकच्या विभागातील मजकुराची निवड करण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्य स्तरावर संस्थेच्या उपक्रमांची नोंद घेतली जाणे ही अभिमानाची बाब मानली जात आहे. पायाभूत सुविधा, अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या निकषांवर संस्थेने हे यश मिळवले आहे.

या सर्व यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक, माजी नामदार बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ.सौ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार श्री.विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अ‍ॅड. प्रतापसिंह पाचपुते, अ‍ॅकॅडमी डायरेक्टर सौ.इंद्रायणी पाचपुते, मुख्य अति. कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अती. अ‍ॅकॅडमी डायरेक्टर डॉ.संजिवजी कदमपाटील,,तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, , इंजीनिअरिंग प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, बी.फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ डी.फार्मसी प्राचार्य रमेश शिंदे सायन्स कॉलेज प्राचार्य डॉ. पांडुरंग इथापे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे परिश्रम कमी आले.

## कार्यकर्त्यांची गरज संपलेले राजकारण : हेरंब कुलकर्णी

(समर्थ गांवकरी)

पूर्वी ग्रामीण भागामध्ये एखाद्याच्या बहिणीचे, एखाद्या कुटुंबात लग्न असते की खूप जमवाजमवी करावी लागायची.. घरासमोर मांडव टाकला जायचा. जेवणाचे साहित्य पाहून आणायचे, स्वयंपाक करायचा, पंगत वाढायची ,सर्व साहित्य पुन्हा पोहोच करायचे यासाठी खूप मनुष्यबळ लागायचे. अशा वेळी त्या कुटुंबातील मुलांचे मित्र हेच त्यासाठी महत्त्वाचे असायचे.. त्यामुळे सर्वजण सर्वांना धरून राहायचे...आपल्याला कधीतरी अशी इतरांची मदत लागणार आहे या भावनेने... इतरांच्या लग्नात मदतीला जायचे..

नंतर मंगल कार्यालय गावोगाव आली. केटरर्स आले आणि संपूर्ण लग्नाचेच कॉन्ट्रॅक्ट घेणारे कॉन्ट्रॅक्टर आले आणि त्यानंतर कोणाची कोणाला गरज भासत नाही. त्यामुळे व्हाट्सअपवर पत्रिका टाकल्या जातात..



आर्थिक समृद्धीने एकमेकांवरचे अवलंबित्व कमी होत गेले.

नेमके तसेच आता राजकारणात घडते आहे.. पूर्वी निवडणुकीत उमेदवाराकडे फार पैसे नसायचे पक्षही वरून फार पैसे द्यायचा नाही. तेव्हा स्टेज बांधणे, समोर सतरंज्या टाकणं ,पोस्टर चिकटवणे, फेरी काढायला कार्यकर्ते मोठ्या संख्येने लागायचे . त्यामुळे नेता छोट्या छोट्या कार्यकर्त्यांनासुद्धा जपायचा..

आता पक्ष ही प्रचंड निधी देतो, उमेदवार ही प्रचंड काळा पैसा असलेला असतो. प्रत्येक गोष्ट विकत घेण्याची क्षमता उमेदवारांनी कमावली आहे .पोस्टर लावणे सभेला माणसे आणणे इथपासून मिरवणुकीत नाचायला अशा प्रत्येक गोष्टीत पैसे देऊन सर्वकाही करता येते..

मग कार्यकर्त्यांची गरज काय..?नगरपालिका महापालिका निवडणुकीचा हाच सांगावा आहे म्हणून कार्यकर्त्यांची गरज नसलेले राजकारण झाले आहेत... उलट

कार्यकर्त्यांनाच पैशाने गब्बर असलेला नेता आज हवा आहे.. गावातल्या लग्नात वाढायला मित्र लागत नाही आणि राजकारणात आता कार्यकर्ते लागत नाही.

## मागासवर्गीयांचा निधी नको : डंबाळे

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी अनुसुचीत जातींसाठी राखीव असलेला सुमारे ३९३ कोटींचा निधी वर्गीकरण करणे अन्यायकारक असल्याने हि कृती सरकारने करु नये अशी भुमिका रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे नेते राहुल डंबाळे यांनी व्यक्त केली आहे. सामाजिक न्याय विभागाने काल २० जानेवारी रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार या विभागाने समारे ३९३.२५ कोटी ( तीनशे त्र्यान्नव कोटी पंचवीस लाख ) इतका मोठा निधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग करण्याचा धक्कादायक निर्णय घेतलेला आहे. अनुसूचित जातींसाठीचा निधी अशा प्रकारे खर्च करता येत नसल्याने शासनाची ही कृती बेकायदेशीर असल्याचे मत डंबाळे यांनी व्यक्त केले आहे.

## 'मिस्टर अँड मिस युनिव्हर्सिटी' आणि 'कॉलेज आयडॉल' ग्रँड फायनलसह
# एनआयईएमचा रौप्य महोत्सव दिमाखात साजरा

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

आशियातील पहिली इव्हेंट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट असलेल्या NIEM (एनआयईएम) ने 'मिस्टर अँड मिस युनिव्हर्सिटी' आणि 'कॉलेज आयडॉल' या प्रतिष्ठित स्पर्धांच्या ग्रँड फायनलचे भव्य आयोजन करत आपल्या २५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा रौप्य महोत्सव दिमाखात साजरा केला. पुण्यातील Sunny's World येथे झालेल्या या सोहळ्याने युवकांच्या प्रतिभेला योग्य दिशा देत 'उद्योगासाठी सज्ज' इव्हेंट प्रोफेशनल्स घडवण्याच्या एनआयईएमच्या वचनबद्धतेला अधोरेखित केले.

हा उपक्रम एनआयईएमचे संस्थापक व डीन डॉ. होशी भिवंडीवाला यांच्या दूरदृष्टीतून साकारला आहे. भारतातील इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्राचे जनक म्हणून



त्यांची व्यापक ओळख आहे.

डॉ. भिवंडीवाला यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाचे नियोजन निती बंगाली, प्रज्ञा चैतन्य, नागेश्वर पाठक, हर्ष दांगोद्रा, विहार मटाले, साक्षी ठाकूर आणि डॉ. कर्णा उपाध्याय यांनी केले. मुंबई व पुणे येथील एनआयईएमच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या अंमलात आणत संस्थेच्या "प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे" या तत्त्वज्ञानाचे प्रभावी दर्शन घडवले.

रौप्य महोत्सवाच्या ग्रँड फायनलला निवेदिता सराफ, गुलशन ग्रोवर, दिव्या दत्ता, निमरत कौर, उपेंद्र लिमये, कुशल बद्रिके आणि स्मिता गोंडकर यांची उपस्थिती लाभली. तसेच महम्मद मोरानी आणि लकी मोरानी यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाबद्दल एनआयईएमने कृतज्ञता व्यक्त केली. याशिवाय मिकी मेहता, जमनादास मजेठिया (जेडी), लॉन्गिनस फर्नांडिस, सनी निम्हण, विपुल शाह, परेश गणात्रा, डेव्हिड व्हिटब्रेड आणि आशिन ए. शाह यांच्या सहकार्याबद्दलही आभार मानण्यात आले.

अंतिम फेरीतील स्पर्धकांसाठी साजिद खान, मिकी मेहता, जमनादास मजेठिया (जेडी), भावेश भाटीजा, अभ्यंग कुर्वेळकर आणि शिखा गोयल यांनी विशेष ग्रूमिंग व मेंटॉरिंग सत्रे घेतली. उद्घाटन सादरीकरणाची कोरिओग्राफी समीर तन्ना आणि अर्श तन्ना यांनी केली. फॅशन कोरिओग्राफी व ग्रूमिंग संदीप धर्मा यांनी सांभाळली. मेक-अप व हेअर स्टायलिंग लीना खांडेकर (ली'ज ब्यूटी) यांनी, स्टायलिंग मोहिनी क्षीरसागर यांनी, वॉर्डरोब रश्मी बुटीक कडून तर बीचवेअर ॲक्सेसरीज टीम पर्णकुटी यांनी पुरवली. सूत्रसंचालन ह्युगो डी'सूझा यांनी केले.

परीक्षक मंडळात महम्मद मोरानी, लकी मोरानी, मानसी स्कॉट, संदीप धर्मा, प्रणव मिश्र, शाम मशाळकर आणि सुभाष धांग यांचा समावेश होता. आत्मविश्वास, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व आणि स्टेजवरील सादरीकरण या निकषांवर स्पर्धकांचे मूल्यमापन करण्यात आले.

# प्रशासकीय उदासीनतेमुळे शेतकरी कुटुंब हवालदिल

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

खराडी येथील वडिलोपार्जित जमिनीच्या फसवणुकीप्रकरणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासनाकडे दाद मागूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने पीडित शेतकरी शेख कुटुंबाने अखेर टोकाचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या दिरंगाईला आणि भूमाफियांच्या त्रासाला कंटाळून शेख कुटुंबाने येत्या २२ जानेवारी २०२६ पासून पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सहकुटुंब आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. श्रमिक पत्रकार भवन या ठिकाणी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत शेतकरी आरीफ कासम बेग, राजाभाऊ चौधरी, प्रभा करपे, हसिना शेख, वकील ताहीर खान फिरोज बेग, आसिफ शेख हे बोलत होते.

खराडी (ता. हवेली) येथील सर्व्हे नंबर २२/२ मधील सुमारे




४ हेक्टर १० आर वडिलोपार्जित जमीन पैकी १२५.५ आर आणि २४आर इतकी जमीन काही अटी व शर्तीवर सन २००६ मध्ये गोयल गंगा डेव्हलपर्सला केवळ विकासासाठी, तेही १८ महिन्यांच्या मुदतीवर देण्यात आली होती. जयप्रकाश गोयल, अतुल गोयल आणि अमित गोयल यांनी आमची फसवणूक केली, असा गंभीर आरोप अर्जदार हसीना अन्वर शेख यांनी केला आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला.

या जमिनीवर न्यायालयाचा आदेश असतानाही बेकायदेशीरपणे सदनिका विक्री करण्यात आल्याचा आरोप केला आहे. याविरोधात आवाज उठविल्यानंतर ३ मे २०२१ रोजी तब्बल २०० ते ४०० गुंडांच्या जमावाने बेग आणि शेख कुटुंबावर प्राणघातक हल्ला केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. कोरोना काळात जमावबंदी लागू असतानाही हा हल्ला झाला, मात्र पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, असा दावा कुटुंबाने केला आहे. व असे व्हिडिओ देखील त्यांनी पत्रकार परिषदेत दाखवले.

चंदननगर व खराडी पोलीस स्टेशन, पुणे महानगरपालिका तसेच दुय्यम निबंधक कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करूनही अधिकारी दोषींनाच पाठीशी घालत असल्याचा आरोप बेग आणि शेख कुटुंबाने केला आहे. न्याय न मिळाल्यास बेमुदत साखळी उपोषण व आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्धार कुटुंबाने व्यक्त केला आहे. या काळात कुटुंबाला काहीही दगाफटका झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासन व संबंधित भूमाफियांवर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्त्या प्रभा करपे म्हणाल्या की सदर प्रकरणात सरकारने लक्ष घालावे. कारण सदरील विषय फार गंभीर आहे. गोयल हा बिल्डर न्यायालयाचा अपमान करत आहे. येथून पुढे सामान्य माणूस सुद्धा न्यायालयात जाणं दहा वेळा विचार करेल तर ह्या कुटुंबांना न्याय मिळावा हीच एवढीच अपेक्षा आहे.

## नव्या कारभाऱ्यांच्या कोर्टात

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

महापालिकेकडून जाहिरात फलकांसाठी केलेली शुल्कवाढ योग्यच असल्याचा निकाल न्यायालयाने दिल्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरातील जाहिरात फलकांचे परवाना शुल्क सुधारित करण्याचा निर्णय घेतला आहे. जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियमानुसार नवीन दर निश्चित केले आहेत. याबाबतचे तीन प्रस्ताव महापालिका प्रशासनाने मुख्य सभेसमोर मांडले होते. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी या प्रस्तावांना स्थायी समितीची मान्यता मिळाली होती. मात्र, मुख्य सभेची अंतिम मान्यता मिळू शकली नव्हती. त्यामुळे सोमवारी झालेल्या मुख्य सभेत हे तिन्ही प्रस्ताव पुन्हा मांडण्यात आले. मात्र प्रशासकांनी या प्रस्तावांवर निर्णय न घेता विषय एक महिना पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता नव्या नगरसेवकांची मुख्य सभा या प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेणार आहे.

# सौ. पूजा निकम यांचा सावर्डे जिल्हा परिषद गटातून उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे:** (समर्थ गांवकरी)

चिपळूण –संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. शेखर निकम सर यांच्या सहचरणी आणि चिपळूण पंचायत समिती माजी सभापती सौ. पूजा निकम यांनी सावर्डे जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि जनतेशी असलेली आत्मीय नाळ यामुळे सौ. पूजा निकम यांचे नाव परिसरात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. सामान्यांच्या सुख-दुःखात कायम सहभागी राहणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असून, महिलांच्या सक्षमीकरणापासून ग्रामविकासापर्यंत त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. आमदार शेखर निकम सरांच्या



मार्गदर्शनाखाली जनसेवेचा वसा पुढे नेत, "विकास, विश्वास आणि संवेदनशीलता" या मूल्यांवर आधारित राजकारणाची नवी आशा त्यांनी या उमेदवारीतून निर्माण केली आहे. सावर्डे गटातील नागरिकांच्या अपेक्षा, स्वप्ने आणि प्रश्नांना प्राधान्य देत सर्वसमावेशक विकासाचा निर्धार व्यक्त करत सौ. पूजा निकम यांनी हा अर्ज दाखल केला.

या उमेदवारीमुळे परिसरात नवचैतन्य निर्माण झाले असून, जनतेतून त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## जनगणना सन २०२७ मध्ये होणार डिजिटल स्वरुपात



**ठाणे:** (समर्थ गांवकरी)

जनगणना २०२७ Houselisting Block Formation (घर यादी तयार करणे) बाबत महत्वाचे प्रशिक्षण मंगळवारी समिती सभागृह, पाचवा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी जनगणना संचालनालयाचे अधिकारी प्रवीण भगत, सहाय्यक निर्देशक व सांख्यिकी अन्वेशक अरुण साळगांवकर यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व चार्ज अधिकारी तसेच त्यांच्या अधिनस्त जनगणना विषयक कामकाज हाताळणारे संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना Houselisting Block Formation (घर यादी तयार करणे) बाबत प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणासाठी स्वतः जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, तहसिलदार (सर्वसाधारण) सचिन चौधर, भिवंडी तहसीलदार अभिजित खोले, मुरबाड तहसीलदार अभिजित देशमुख, शहापूर तहसीलदार परमेश्वर कासुळे, अंबरनाथ तहसीलदार अमित पुरी यांच्यासह इतर संबंधित अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

# मागण्या मान्य झाल्याने पालघर जिल्हाधिकारी कार्यालय घेराव स्थगित करणार !

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

ठाणे पालघर जिल्ह्यामध्ये होत असलेले वाढवन व मुरबे बंदर रद्द करा, कसत असलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करा, स्मार्ट मीटर रद्द करा इत्यादी मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने जबरदस्त लॉग मार्च काढण्यात आला. दोन दिवस पायी चालत हजारो शेतकरी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. लॉन्ग मार्चच्या तिसऱ्या दिवशी आज संपूर्ण दिवसभर स्थानिक मागण्यांबाबत पालघर जिल्हाधिकारी यांच्याबरोबर शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या समस्यांबद्दल सकारात्मक भूमिका



जिल्हाधिकारी यांनी घेतली. त्याचबरोबर वरकस व बेनामी जमिनी नावे करण्याच्यासाठी कालबद्ध कृती कार्यक्रम जाहीर करण्याचे मान्य करण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आणि किसान सभेच्या पाच कार्यकर्त्यांचा समावेश असलेली एक समितीही यासाठी तातडीने गठीत करण्यात आली. देवस्थान इनाम जमिनी बद्दल राज्य सरकार तातडीने कायदा करणार असून याबद्दलचा ड्राफ्ट यावेळी किसान सभेला देण्यात आला. अकोले ते लोणी लॉग मार्चच्या वेळी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे वरकस जमिनीबद्दल अद्यापही कारवाई करण्यात आली नव्हती. पालघर लॉग मार्चमध्ये याबाबत ठोस कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. धरणांमधील पाण्यावर स्थानिकांचा हक्क, सिंचन व पिण्यासाठी पाणी, घराच्या तळ जमिनी नावे करण्यासाठी कार्यवाही, रोजगार हमी कामांची उपलब्धता या मागण्याही यावेळी मान्य करण्यात आल्या. आदिवासी शेतकऱ्यांच्या स्थानिक मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याने ठाणे पालघर येथील लॉग मार्च नंतर सुरू करण्यात आलेला जिल्हाधिकारी कार्यालय घेराव स्थगित करण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष घेत आहे. मात्र या लॉन्ग मार्चमध्ये वाढवण बंदर व मुरबे बंदर रद्द करण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच स्मार्ट मीटर लावणे बंद करण्याची मागणी महाराष्ट्रभर होत आहे. या दोन्ही मागण्या राज्य सरकारशी संबंधित आहेत. ठाणे पालघर जिल्ह्यातील प्रश्नाबाबत येथील जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दाखवला असला तरी नाशिक जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या आंदोलनाबद्दल तेथील जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दाखवलेला नाही.

नाशिक जिल्ह्यामध्ये अनेक तालुक्यांमध्ये गेल्या पाच दिवसापासून हजारो शेतकरी रास्ता रोको करत बेमुदत बसून आहेत. त्यांच्याही अनेक मागण्या राज्य सरकारशी संबंधित आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाला पालघर येथे टाकलेला घेराव स्थगित करत असताना राज्यस्तरीय मागण्यांसाठी व नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मागण्यासाठीचे आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घेतला आहे.

राज्य सरकारच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाची पुढील दिशा काय असेल याबाबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राज्य कमिटी व किसान सभेचे कमिटी तसेच प्रमुख नेते बैठक घेऊन पुढील निर्णय करणार आहेत. पालघर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झालेल्या चर्चेमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे, आ. विनोद निकोले, माकप जिल्हा सचिव किरण गहला, जनवादी महिला संघटनेच्या नेत्या प्राची हातिवलेकर, रडका कलंगडा, लक्ष्मण डोंबरे, लहानी दौडा, प्राची हातिवलेकर, सुनीता शिंगडा, अमृत भावर, चंदू धांगडा, यशवंत बुधर, गणेश दुमाडा, हर्षल लोखंडे आदींनी सहभाग घेतला.

# नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्लांटने मोल्डिंग सोल्यूशन्सच्या जागतिक धोरणाला केले दृढ

पुणे : (समर्थ गांवकरी)

मोल्डिंग सोल्यूशन्सने आपले ब्रँड्स मॅनेर, फोबोहा, सिन्वेन्टिव्ह, थर्मोप्ले, गॅमाफ्लक्स आणि प्रियामस यांच्यासह सहयोगाने भारतात आपल्या नवीन ग्रीनफिल्ड प्लांटचे अधिकृतरित्या उद्घाटन केले आहे, ज्यासह आपल्या आंतरराष्ट्रीय उत्पादन व सेवा उपस्थितीमध्ये अधिक वाढ केली आहे. हा प्लांट कंपनीच्या दीर्घकालीन धोरणाचा प्रमुख भाग आहे आणि हॉट रनर सिस्टम्समधील कंपनीच्या जागतिक स्पर्धात्मकतेला मोठ्या प्रमाणात प्रबळ करतो.

20 जानेवारी 2026 रोजी इंडिया ग्रँड ओपनिंगचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये पारंपारिक भारतीय उद्घाटन समारोह पार पडला. 21 जानेवारी 2026 रोजी ग्राहकांना व सहयोगींना कस्टमर इव्हेण्टमध्ये आमंत्रित करण्यात आले, जेथे नवीन




प्लांट आणि त्यामधील टेक्निकल क्षमतांबाबत माहिती देण्यात आली.

**प्रमुख विकास बाजारपेठ म्हणून भारताचे महत्त्व :** भारत इंजेक्शन मोल्डिंग उपयोजनांसाठी जगातील सर्वात मोठी आणि झपाट्याने विकसित होत असलेली बाजारपेठ आहे. नवीन प्लांटसह मोल्डिंग सोल्यूशन्स या प्रदेशातील ग्राहकांच्या जवळ पोहोचली आहे, तसेच शाश्वत विकासासाठी प्रबळ पाया निर्माण करत आहे. या गुंतवणूकीचा वितरणासाठी लागणारा कालावधी कमी करण्याचा, उत्पादन क्षमता वाढवण्याचा आणि सेवा पातळ्यांमध्ये अधिक सुधारणा करण्याचा मनसुबा आहे.

हॉटर रनर सिस्टम्स आणि संबंधित मोल्डिंग तंत्रज्ञानांसाठी जागतिक बाजारपेठ कोट्यवधी डॉलर्स असण्याचा अंदाज आहे, जेथे मोल्डिंग सोल्यूशन्सचा सध्या जागतिक स्तरावर 10 टक्क्यांपेक्षा कमी मार्केट शेअर आहे. भारतात, कंपनीचा ही बाजारपेठ जवळपास 200 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स असण्याचा अंदाज आहे, जेथे मार्केट शेअर 15 टक्के ते 20 टक्क्यांपर्यंत आहे, ज्यामधून प्रांतामधील कंपनीची प्रबळ विकास गती दिसून येते.

मोल्डिंग सोल्यूशन्सने ऑटोमोटिव्ह क्षेत्रात आपले प्रबळ स्थान निर्माण केले आहे. विशेषत: सिन्वेन्टिव्ह ब्रँडच्या माध्यमातून कंपनीला अचूकपणे मोल्ड केलेले कम्पोनण्ट्स आणि प्रगत उत्पादन मानकांसाठी वाढती मागणी पाहता वैद्यकीय, आरोग्यसेवा, एफएमसीजी, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांमध्ये झपाट्याने वाढ करण्याची संधी दिसत आहे.

**जागतिक उत्पादन धोरणाचा भाग म्हणून लोकल-फॉर-लोकल :** आतापर्यंत चीनमधील मोल्डिंग सोल्यूशन्सच्या उत्पादन प्लांट्सनी भारतातील बहुतांश बाजारपेठांच्या गरजांची पूर्तता केली आहे. नवीन प्लांट या अवलंबनाला मोठ्या प्रमाणात कमी करते, तसेच सातत्यपूर्ण लोकल-फॉर-लोकल दृष्टिकोन सक्षम करते. भारतातील प्लांट देशांतर्गत बाजारपेठेला पुरवठा करण्यासोबत व्यापक आशियाई प्रांतासह आग्नेय आशिया, जपान व दक्षिण कोरियामधील बाजारपेठांना देखील पुरवठा करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. याव्यतिरिक्त चीनमधील प्लांट आपल्या देशांतर्गत बाजारपेठेला स्वतंत्रपणे पुरवठा करत राहिल.

मोल्डिंग सोल्यूशन्सच्या नेतृत्वामधून निदर्शनास आले की भारत आता आशियासाठी (चीन वगळून) कंपनीचे प्रमुख उत्पादन व सेवा केंद्र बनण्यास सज्ज आहे, ज्यासह पुरवठा यंत्रणेची स्थिरता प्रबळ होईल आणि सीमेपलीकडून आयातींवरील अवलंबन कमी होईल.

भारतामधून मोल्डिंग सोल्यूशन्स देशांतर्गत बाजारपेठेला व आशियामधील इतर देशांना पुरवठा करते, तसेच विद्यमान ठिकाणांमध्ये बदल न करता जागतिक उत्पादन क्षमतेमध्ये वाढ करण्यात आली आहे.

भारत जगभरातील आमच्या विकासासामधील सर्वात महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे. या नवीन प्लांटसह आम्ही वितरणाकरिता लागणारा कालावधी कमी करण्याठी, उत्तम स्थिरतेसाठी आणि प्रांतामधील ग्राहकांसोबत टेक्निकल सहयोग करण्यासाठी स्थिती निर्माण करत आहोत, तसेच आमच्या जागतिक मानकांचे पालन करत आहोत, असे मोल्डिंग सोल्यूशन्सचे अध्यक्ष मार्सेलो वेंडेमियाटी म्हणाले.

**प्लांटवरील सर्वसमावेशक हॉट रनर क्षमता :** नवीन प्लांट हॉट रनर सिस्टम्सचा विकास, उत्पादन व पाठिंब्यासाठी क्षमतांची संपूर्ण श्रेणी देतो. कार्यसंचालनांच्या सुरूवातीपासून सिन्वेन्टिव्ह आणि थर्मोप्ले ब्रँड्सच्या सिस्टम्सचे साइटवर उत्पादन करण्यासोबत साह्य करण्यात आले आहे.

सध्या, पुण्यातील प्लांटची कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओमधील जवळपास 50 टक्के उत्पादन करण्याची क्षमता आहे, तसेच बाजारपेठेतील मागणी वाढण्यासह स्थानिक कार्यसंचालनांमध्ये अधिक वाढ होत असल्यामुळे संपूर्ण उत्पादन श्रेणी वाढवण्याची योजना आहे.

**प्रमुख टेक्निकल क्षमता पुढीलप्रमाणे:**

- **डिझाइन इंजीनिअरिंग**
- **मोल्ड फ्लो विश्लेषण**
- **उपयोजनाबाबत तपासणी**
- **हॉट रनर सिस्टम्सची असेम्ब्ली**
- **विक्री-पश्चात्त सेवेसह रिपेअर सेंटर**
- **दर्जा व्यवस्थापन आणि प्रमुख अकाऊंट मॅनेजमेंट**

या सेटअपमध्ये हॉट रनर मूल्य सखळीच्या सर्व प्रमुख टप्प्यांचा समावेश आहे आणि जागतिक स्तरावर सतत दर्जा व प्रक्रिया मानक राखले जाण्याची खात्री घेतली जाते.

## जेएसएस विभागीय परिषद आणि भागधारकांचा सल्लामसलत मेळावा संपन्न

पुणे : (समर्थ गांवकरी)

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या (एमएसडीई) वतीने आज पुण्यातील 'सिम्बायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी' येथे आयोजित दोन दिवसीय 'जन शिक्षण संस्थान' (जेएसएस) विभागीय परिषद, भागधारकांचा सल्लामसलत मेळावा आणि प्रगती आढावा कार्यशाळा संपन्न झाली. या परिषदेद्वारे भारत सरकारने शेवटच्या घटकापर्यंत सर्वसमावेशक, समुदाय-आधारित कौशल्य विकास आणि शाश्वत उपजीविका निर्मिती करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाद्वारे आयोजित या परिषदेत ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील



१५२ जन शिक्षण संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात जेएसएसचे अभ्यासक, मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी, जन शिक्षण संस्थान संचालनालयाचे अधिकारी, 'निसबूड' चे प्रतिनिधी आणि शैक्षणिक भागीदार एकत्र आले होते. याद्वारे जेएसएस परिसंस्थेतील प्रगतीचा आढावा घेणे, प्रणालीगत सुधारणांवर चर्चा करणे आणि संस्थात्मक क्षमता वाढवणे यावर भर देण्यात आला. या परिषदेचे अध्यक्षपद कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबश्री मुखर्जी यांनी भूषवले. यावेळी मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव निरंजन कुमार सुधांशू आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रोजगाराभिमुखता, उद्योजकता आणि उपजीविकेचे परिणाम अधिक बळकट करण्यावर या परिषदेत विशेष भर देण्यात आला. परिषदेला संबोधित करताना देबश्री मुखर्जी म्हणाल्या की, भारतातील सर्वसमावेशक कौशल्य विकासामध्ये 'जन शिक्षण संस्थां'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आमचा मुख्य उद्देश प्रशिक्षणाकडून प्रत्यक्ष परिणामांकडे वळण्याचा आहे. यासाठी माजी विद्यार्थ्यांशी संपर्क वाढवणे, बाजारातील मागणीनुसार कौशल्ये विकसित करणे आणि वित्त व बाजारपेठेशी जोडून उद्योजकतेला पाठबळ देणे आवश्यक आहे.

## आयसीएसआयचे २०२६ साठी नेतृत्व जाहीर

पुणे : (समर्थ गांवकरी)

इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) ने १९ जानेवारी २०२६ पासून लागू होणाऱ्या २०२६ या वर्षासाठी सीएस पवन जी चांडक यांची अध्यक्षपदी, तर सीएस द्वारकानाथ चेनूर यांची उपाध्यक्षपदी निवड जाहीर केली आहे. कॉर्पोरेट आणि संबंधित कायद्यांमध्ये दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले सीएस पवन जी चांडक यांनी यापूर्वी २०२५ मध्ये आयसीएसआयचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. तसेच त्यांनी प्रादेशिक व शाखा स्तरावर विविध नेतृत्वाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. आयसीएसआयचे फेलो सदस्य आणि दिवाळखोरी व्यावसायिक असलेले सीएस द्वारकानाथ चेनूर यांना कॉर्पोरेट कायदे व दिवाळखोरी क्षेत्रातील व्यापक अनुभव आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने लॉन्च केली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला

### वेळ आली आहे इलेक्ट्रिक मोबिलिटीची नवीन व्याख्या अनुभवण्याची

मुंबई : (समर्थ गांवकरी)

टोयोटा किर्लोस्कर मोटर (TKM) ने आज ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला लॉन्च करण्याची घोषणा केली. अशाप्रकारे टोयोटाने भारताच्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन सेगमेन्टमध्ये पदार्पण केले आहे. इलेक्ट्रिफाईड मोबिलिटीत टोयोटाच्या जागतिक नैपुण्यासह, ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलामध्ये बोल्ड SUV स्टाइलिंग, प्रीमियम केबिन अनुभव तसेच आत प्रशस्त जागा, प्रगत टेक्नॉलॉजी आणि स्मूद, विश्वसनीय इलेक्ट्रिक परफॉर्मन्सची खात्री आहे. अर्बन SUV संकल्पनेतून जन्मलेली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला, टोयोटाच्या मल्टीपाथ दृष्टिकोनास पुढे घेऊन जाण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जे ग्राहकांना इलेक्ट्रिफाईड पॉवरट्रेन




टेक्नॉलॉजीचे अधिक पर्याय देते आणि भारताच्या एनर्जी सिक्युरिटी आणि डीकार्बनायझेशनच्या लक्ष्यास पाठिंबा देते. प्रस्तुत नवीन ऑफरिंगबाबत टिप्पणी करताना टोयोटा किर्लोस्कर मोटरचे अध्यक्ष, मॅनिजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर श्री. मसाकाझू योशिमुरा म्हणाले, "ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाचे लॉन्चिंग हे आमच्या मल्टीपाथवे दृष्टिकोनास पुढे नेण्याच्या दिशेतील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आमचे लक्ष्य सर्वांना सोबत घेऊन कार्बन न्यूट्रलिटीत योगदान देण्याचे आहे. आता, भारतात ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाच्या लॉन्चसह आम्ही हरित मोबिलिटीच्या दिशेने होणाऱ्या भारताच्या प्रवासात आमचे समर्थन अधिक मजबूत करण्याबाबत वचनबद्ध आहोत. आमची आकर्षक उत्पादन श्रेणी, टेक्नॉलॉजी लीडरशिप, सशक्त आफ्टर-सेल्स सर्व्हिस आणि डीलरशिप नेटवर्कसह, आम्ही सर्वांना मोबिलिटीचे स्वातंत्र्य देत आपले शाश्वत मोबिलिटीचे लक्ष्य प्राप्त करू इच्छितो." या प्रसंगी उपस्थित असलेले टोयोटा किर्लोस्कर मोटरचे डेप्युटी मॅनिजिंग डायरेक्टर, श्री. तादाशी असाझुमा म्हणाले, "इलेक्ट्रिफाईड टेक्नॉलॉजीत तीन दशकांच्या जागतिक नैपुण्यासह टोयोटाने वेगवेगळ्या मोबिलिटी गरजा पूर्ण करण्यासाठी निरंतर फोकस्ड इनोव्हेशनमध्ये गुंतवणूक केली आहे. परिणामी, जगभरात आमच्या ग्राहकांनी आजवर आमच्या 38 मिलियन इलेक्ट्रिफाईड गाड्यांसह 197 मिलियन टनपेक्षा जास्त कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) चे उत्सर्जन होण्यापासून वाचवले आहे. या प्रगतीच्या मुळाशी आमचे मास हॅपीनेसचे तत्त्वज्ञान आहे आणि त्याचा पाया कार्बन न्यूट्रलिटीचा आहे. याचा उपयोग आम्हाला टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या पहिल्या BEV, ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाच्या निर्मितीत झाला आहे. आमचा प्री-लॉन्च रेडीनेस उत्पादनाच्या बराच पुढे आहे, जो हे सुनिश्चित करतो की, ग्राहकांना टोयोटाचे जागतिक मानक आणि भारतात भविष्य-तत्पर आणि शाश्वत मोबिलिटीच्या आमच्या व्हिजनशी सुसंगत एक निर्वेध आणि चिंता-मुक्त मालकीचा अनुभव मिळेल."

## ब्लेंडर्स प्राईडने झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची केली घोषणा

### केवळ दहा लाख बॉटल्सची मर्यादित निर्मीती, जिथे बोल्ड ब्लॅक डिझाइन आणि आयकॉनिक वारसा प्रीमियम व्हिस्कीच्या उत्तमतेला अधिकच उत्तम बनवतो

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

भारताच्या प्रीमियम व्हिस्की विभागातील अग्रेसर असलेल्या ब्लेंडर्स प्राइडने, ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही एक मर्यादित-एडिशन असून, यात आकर्षक काळ्या रंगाची स्टाइल आणि आकर्षक ब्लेंडर्स प्राइडचे मिश्रण असून त्याआधारे एक खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव निर्माण करण्यात आला आहे.

उत्तम आरामदायीपणा आणि वेगळेपणाचे प्रतीक असलेल्या आकर्षक काळ्या डिझाइनमध्ये सादर केलेली, झेनिथ ब्लॅक एडिशन विशेषतः अशा व्यक्तींसाठी तयार करण्यात आली आहे जी व्हिस्कीची जाणकार असून – लाखात एक असेल. केवळ दहा लाख बॉटल्स उपलब्ध असल्याने,




ही एडिशन जितकी सुंदर आहे, तितकीच दुर्मिळही आहे.

आरामदायीपणाच्या या जगात, काळा रंग हा केवळ रंगच नाही तर आणखी बरेच काही दर्शवतो. काळा रंग म्हणजे वृत्ती आहे, तो एक प्रतिष्ठा आणि सामर्थ्याची झलक आहे. ब्लेंडर्स प्राइडशी दीर्घकाळापासून संबंधित असलेला काळा रंग, आता एका नाविन्यपूर्ण डिझाइनमध्ये केंद्रस्थानी आहे, ज्यामुळे प्रीमियम व्हिस्की आणखीणच आकर्षक बनते. ही एडिशन केवळ नवीन पॅकेजिंग नव्हे; तर स्टाईलचे एक्सप्रेशन आहे, ही अशा लोकांसाठी आहे जे ट्रेंडच्या मागे धावत नाहीत, तर स्वतःच ट्रेंड निर्माण करतात.

पर्नोड रिकार्ड इंडियाच्या CMO देवश्री दासगुप्ता म्हणाल्या, "ब्लेंडर्स प्राइड भारतात प्रीमियम व्हिस्कीचे बेंचमार्क सातत्याने नवनवीन पद्धतीने तयार करत असते. झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीमुळे हा ब्रँडचा आतापर्यंतचा सर्वात उत्कृष्ट आविष्कार समोर आला आहे. ही एक अशी उत्क्रांती आहे, जी व्हिस्कीच्या वारस्याला धाडसी नवीन डिझाइन स्टाईलमध्ये बदलते. या वर्षी, ब्लेंडर्स प्राइड महत्त्वाकांक्षा, वेगळेपणा आणि कारागिरीचा गौरव करणाऱ्या सौंदर्यदृष्टीतून आपली मुलभूत मूल्ये जागृत करत आहे. केवळ दहा लाख बॉटल्सपुरते मर्यादित असलेली झेनिथ ब्लॅक एडिशन अशा व्यक्तींसाठी तयार केली गेली आहे, ज्या केवळ उत्तमतेचे कौतुकच करत नाहीत, तर स्वतःमध्ये ती उत्तमता आणण्याचा प्रयत्न करतात."

ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशन अशांसाठी आहे जे नेहमी वेगळे काहीतरी शोधत असतात – ही एडिशन असा एक असाधारण अनुभव आहे जो गुणवत्तेशी तडजोड न करता खरोखर काहीतरी देतो.

संपूर्ण भारतात सुरूवात होणार असलेली ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशन सध्या मात्र केवळ निवडक स्टोअर्समध्येच उपलब्ध आहे.

## लेक्स नोव्हा – आयपीआर संशोधन केंद्राचे उद्घाटन

मुंबई: (समर्थ गांवकरी)

केईएस श्री जयंतीलाल एच. पटेल लॉ कॉलेजने बौद्धिक संपदा हक्क (IPR) क्षेत्रातील कायदेशीर जागरूकता वाढवणे आणि शैक्षणिक संशोधनाला चालना देणे या उद्देशाने लेक्स नोव्हा – बौद्धिक संपदा संशोधन केंद्राचे यशस्वीपणे उद्घाटन केले. उपस्थितांना संबोधित करताना, प्रभारी प्राचार्या डॉ. व्हायरल दवे यांनी सांगितले की, लेक्स नोव्हाची स्थापना हे कायद्याच्या उदयोन्मुख आणि विशेष क्षेत्रांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्याप्रती संस्थेच्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. त्यांनी यावर जोर दिला की, हे केंद्र कायदेशीर शिक्षण, नावीन्य आणि उद्योगाच्या गरजा यांच्यातील दरी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

## अमेझॉनकडून भारतात नवे स्मार्ट डिस्प्ले दाखल

मुंबई : (समर्थ गांवकरी)

अमेझॉनने भारतात आपले नवे इको शो ११ आणि चौथ्या पिढीतील इको शो ८ हे स्मार्ट डिस्प्ले सादर केले आहेत. घरगुती वापर अधिक सुलभ आणि स्वयंचलित करण्याच्या दृष्टीने ही उपकरणे विकसित करण्यात आली असून, त्यामध्ये प्रगत संवेदक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

नव्या इको शो मालिकेत ऑम्निसेन्स या सानुकूल संवेदक प्रणालीचा समावेश आहे. उपस्थिती, हालचाल आणि तापमान यांचा अभ्यास करून घरातील दिवे, तापमान व्यवस्था तसेच दैनंदिन दिनक्रम आपोआप जुळवून देण्याची क्षमता या उपकरणांमध्ये आहे.

या स्मार्ट डिस्प्लेंमध्ये पूर्णपणे नवीन श्राव्य रचना देण्यात आली आहे. समोरील बाजूने आवाज देणारे स्टीरिओ स्पीकर्स आणि खास तयार केलेले वूफर्स यामुळे




संपूर्ण खोली भरून टाकणारा अवकाशीय आवाज अनुभवता येतो.

इको शो ११ मध्ये अकरा इंचांचा संपूर्ण उच्च दर्जाचा पडदा असून, इको शो ८ मध्ये साडेआठ इंचांचा उच्च दर्जाचा पडदा देण्यात आला आहे. टोकापासून टोकापर्यंत काच असलेला पडदा, पातळ कडा आणि आटोपशीर रचना यामुळे पाहण्याचा भाग अधिक मोठा मिळतो.

ही उपकरणे घरातील स्मार्ट साधनांचे नियंत्रण, दिनक्रम निश्चिती, दृश्य-श्राव्य सामग्रीचा आनंद, दिनदर्शिका व खरेदी यादीचे व्यवस्थापन तसेच पाककृती शोधण्यासाठी उपयुक्त ठरतात. स्पर्श नियंत्रणासोबतच आवाजाच्या आदेशांद्वारेही ही सर्व कामे करता येतात.

अमेझॉन उपकरणे भारताचे संचालक दिलीप आर. एस. यांनी सांगितले की, "कुटुंबाचे नियोजन, घराचे व्यवस्थापन किंवा दैनंदिन धावपळीत मदत करण्यासाठी ही उपकरणे तयार करण्यात आली आहेत.

## एअरटेल आयपीटीव्ही सोबत रिपब्लिक डे वीकेंड खास बनवा

मुंबई : (समर्थ गांवकरी)

रिपब्लिक डे च्या आठवड्याच्या सुट्टीत आता आपल्या मनाला ताजेतवाने करण्याची वेळ आली आहे. फक्त तिरंगा फडकवणे, कौटुंबिक जेवण किंवा सुट्टीचा आनंद घेणे पुरेसे नाही; हृदयाला भिडणारे, साहस, धैर्य आणि स्वातंत्र्याचे संदेश देणारे चित्रपट पाहून तुम्ही स्वतःला प्रेरणा आणि आनंद देऊ शकता. एअरटेल आयपीटीव्हीच्या माध्यमातून तुम्ही 29+ स्ट्रीमिंग ॲप्स, 600+ लाईव्ह टीव्ही चॅनेल्स आणि ऑन-डिमांड लायब्ररीसह हे चित्रपट घरच्या मोठ्या स्क्रीनवर पाहू शकतात. रिपब्लिक डे च्या दिवशी बघण्याजोग्या चित्रपटांमध्ये 'फ्रीडम ॲट मिडनाईट सीझन 2, 'द नाईट मॅनेजर सीझन 2', ए नाईट ऑफ द सेवन किंगडम्स, 'टास्करी: द स्मगलर्स वेब', 'हायजॅक', 'स्ट्रेंजर




थिंग्ज 5' यासारखी थरारक मालिका तसेच '120 बहादूर', "बॉर्डर', 'शेरशाह', 'उरी: द सर्जिकल स्ट्राइक', 'राझी' यासारखी देशभक्ती प्रेरित चित्रपटं उपलब्ध आहेत. एअरटेल आयपीटीव्हीचे प्लॅन्स फक्त 699 रुपयांपासून सुरू होतात आणि नवीन प्लॅन्सवर एअरटेल थँक्स ॲपद्वारे 30 दिवसांची मोफत सेवा देखील मिळते. या दिवशी देशभक्ती, शौर्य आणि प्रेरणादायी कथा पाहून सुट्टीचा आनंद दुपटीने वाढवा आणि देशभक्तीच्या भावनेत लांब वीकेंड साजरा करा!

## असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाच्या परिषदेचे आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)

पुणे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स (पीएएसएस) तर्फे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडिया (एएसएसआय) च्या 39 व्या वार्षिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. ही परिषद 22 ते 25 जानेवारी 2026 दरम्यान पुण्यातील जे.डब्ल्यू मॅरियट हॉटेलमध्ये पार पडणार आहे. एएसएसआयकॉन 2026 परिषदेच्या आयोजन समितीचे सचिव आणि संचेती हॉस्पिटलच्या स्पाईन आणि न्युरोसायन्स विभागाचे प्रमुख डॉ.शैलेश हदगावकर म्हणाले की, एएसएसआयकॉन 2026 मधील एक महत्त्वाची बाब म्हणजे यामध्ये अमेरिकन स्कोलिओसिस रिसर्च सोसायटी,ब्रिटिश असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स - बीएएसएस, कोरियन




मिनिमली इनव्हेझिव्ह स्पाईन सोसायटी - केओएमआयएसएस, सिंगापूर असोसिएशन ऑफ स्पाईन सोसायटी अँन्ड एओ स्पाईन - अ ग्लोबल ॲकॅडेमिक कम्युनिटी फॉर स्पाईन केअर यांसारख्या पाच प्रतिष्ठित स्पाईन सर्जन्सच्या संघटना तसेच नेपाळ व श्रीलंका या देशातील प्रतिनिधी भारतात प्रथमच एकत्र येणार आहेत. आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश पारसनीस म्हणाले की, या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ एकत्र येणार असून सुमारे 1200 स्पाईन सर्जन्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या परिषदेत मणक्याशी संबंधित विविध समस्या,विकृती त्याचे आधुनिक पध्दतीने निदान,उपचार यांसह अनेक शैक्षणिक, तांत्रिक व वैज्ञानिक चर्चासत्रे,शोधनिबंध स्पर्धा,प्रश्नमंजुषा,टेडटॉक्स,बीज भाषणे असे अनेक कार्यक्रम पार पडतील. पुणे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स (पीएएसएस) चे खजिनदार डॉ.प्रद्युन्म पै रायतुरकर म्हणाले की,मानेचे दुखणे,कमरेचा त्रास,मणक्याच्या विविध समस्या,स्कोलिओसिससारख्या विकृती,रिव्हीजन स्पाईन समस्या,ऑस्टिओपोरोसिस, लहान मुलांमधील मणक्याच्या समस्या आदी विषयांवर या परिषदेत चर्चा व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ.एस.के.श्रीवास्तव म्हणाले की, ही परिषद मणक्याच्या समस्यांसाठी शस्त्रक्रिया न करता दिल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पध्दतींचा तसेच मणक्याच्या समस्यांवर उपचार करण्यासाठी अत्याधुनिक उपचार व कार्यप्रणालींचा एक उत्कृष्ट मिलाफ ठरणार आहे.असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाचे सचिव डॉ.अप्पाजी कृष्णन म्हणाले,या परिषदेत रोबोटिक स्पाईन शस्त्रक्रिया,नेव्हिगेशन-आधारित स्पाईन शस्त्रक्रिया आणि एंडोस्कोपिक स्पाईन शस्त्रक्रिया यांसारख्या मणक्याच्या शस्त्रक्रियांमधील अत्याधुनिक प्रगत तंत्रांचा समावेश असेल. डॉ.शैलेश हदगावकर पुढे म्हणाले की, प्रख्यात तज्ञांच्या नेतृत्वाखालील विविध एएसएसआय अभ्यासगट अनेक विषयांवर मार्गदर्शन करतील. यामुळे तरूण पिढीतील मणका शल्यचिकित्सकांना उपचार कार्यप्रणाली तयार करण्याबाबत मार्गदर्शन मिळेल,तसेच सध्या कार्यरत असलेल्या अनेक अनुभवी शल्यचिकित्सकांकडून नवीन संकल्पना समजून घेण्यास मदत होईल.